# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १६ जुलै, २०१५ / आषाढ २५, १९३७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ७८**

---------------------------------

### राणीउंचेगाव (ता. घनसावंगी, जि.जालना) येथील सेवा सहकारी संस्थेने केलेला अपहार

**(१) * १८०६० श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राणीउंचेगाव (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या शाखाधिकाऱ्याने तीन बनावट खाते उघडून लाखो रुपयांचा अपहार केल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

राणी उंचेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन श्री. श्रीरंग शिंदे व जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेचे श्री. ज्ञानेश्वर कोरडे यांनी संगनमत करुन रु. १,९०,००० चा अपहार केलेला आहे.

(२) सदर प्रकरणी श्री. ज्ञानेश्वर कोरडे व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन श्री. श्रीरंग शिंदे यांचेबाबत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दिनांक ११.०५.२०१५ च्या संचालक मंडळाच्या सभेतील ठरावानुसार श्री.कोरडे यांना निलंबीत करुन पोलिस स्टेशन अंबड येथे संबंधितांविरुध्द FIR क्र. ९८/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोळवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आदिवासी वसतिगृहाच्या भाड्याची रक्कम थकल्याबाबत**

**(२) * १९८१४ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आदिवासी वसतिगृहाच्या भाड्याची रक्कम थकल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना वसतिगृहाबाहेर काढण्यात आल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात तेथील मुलांनी खांदा कॉलनी येथील वसतिगृहात आंदोलन सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या वसतिगृहांच्या भाड्याची रक्कम थकविण्याची कारणे काय आहेत तसेच नविन वसतिगृहासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) दिनांक ०२.०४.२०१५ रोजी वसतीगृहाचे इमारत मालक व भोजन ठेकेदार यांच्यामध्ये झालेल्या शाब्दीक वादावादीमुळे इमारत मालकाने रागाने भोजन गृहास व भोजन साहित्य असलेल्या खोलीस कुलुप लावून विद्युत पुरवठा बंद केल्याचा प्रकार घडला होता. मात्र प्रकल्प अधिकारी, पेण यांनी इमारत मालकांशी संपर्क साधून समजुत काढल्याने सदर भोजन गृह व भोजन साहित्याच्या खोलीचे कुलुप काही कालावधीतच उघडण्यात आले.

(२) वरील घटनेची माहिती कोळवाडी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी खांदा कॉलनी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना दिल्याने खांदा कॉलनी वसतीगृहातील काही विद्यार्थी कोळवाडी येथील वसतीगृहात आले होते. त्यावेळी कोळवाडी वसतीगृहातील ८५ विद्यार्थी दि. ०२.०४.२०१५ रोजी खांदा कॉलनीतील वसतीगृहातील मुलांसमवेत गेले होते, हे खरे आहे.

(३) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह कोळवाडी, पनवेल (नवीन) येथील वसतीगृह इमारतीचे भाडे तरतुदी अभावी प्रलंबित होते. आता अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर तरतुद प्राप्त झाली असल्याने दि.०८.०७.२०१५ रोजी इमारत भाडयाची देयके कोषागारात सादर केली असून रक्कम आहरीत करुन इमारत मालकास भाडयाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही गृहपाल स्तरावरुन करण्यात येईल. तसेच प्रस्तूत वसतीगृहासाठी पनवेल येथील बी.एड महाविद्यालयाची रिकामी असलेली इमारत तात्पुरत्या स्वरुपात मिळणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील वाडा-देवगाव**
**रस्त्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३) * २१७७२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत पालघर-वाडा-देवगाव रस्ता कि.मी. ६१/०० ते ६३/०० या साखळमध्ये विशेष दुरुस्ती कामांसाठी ४३ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कि.मी. मध्ये विशेष दुरुस्तीचे वा किरकोळ दुरुस्तीचे कोणतेही काम न करता उपलब्ध ४३ लाख रुपये निधीतून मे.हर्षद एन.गंधे कन्स्ट्रक्शन कंपनीला ८ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणतेही काम न करता मोजणी पुस्तकात बोगस नोंदी करणा-या संबंधित अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

सदर कामास विशेष दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत रु.५०.०० लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) नाही.

या रस्त्याचे दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात झाले असून मार्च-२०१५ अखेर मे.हर्षद एन. गंधे कन्स्ट्रक्शन कंपनीला रु.६.६२ लक्ष रुपयांचा धनादेश देण्यात आला.

(३) व (४) प्रत्यक्ष काम करण्यात आले असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने राज्यातील भूविकास बँका अवसायनात काढण्याचा घेतलेला निर्णय**

**(४) * १६४४७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी व ग्रामीण विकासात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणा-या

भूविकास बँका अवसायनात काढण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर बँकांच्या भवितव्याबाबत निर्णय घेण्यासाठी मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय, असल्यास, या समितीने कोणते निष्कर्ष काढले आहेत,

(४) असल्यास, या भूविकास बँका अवसायनात काढल्यास शेतक-यांना कर्जसुविधा कशाप्रकारे देण्यात येणार आहे तसेच बँकेतील कर्मचा-यांबाबत शासनाची कोणती भूमिका आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्य शासनाने १२ मे, २०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीत भु-विकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

(२) भु-विकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत :-

(१) लघुगटाने केलेल्या शिफारशीनुसार पुरेशी पतक्षमता नसणे.

(२) बँकेचे पुनरुज्जीवन केल्यास रु.१२३.८८ कोटी नाबार्डला परत करावी लागणे.

(३) नव्याने कर्जवाटपासाठी बँकेकडे निधी उपलब्ध नसणे.

(४) बँकेकडून शासनास कर्ज येणे असल्याने शासनाची हमी मिळणार नाही.

(५) बँकींग परवाना प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निकषांची बँक पुर्तता करीत नाही.

(६) वैद्यनाथन पॅकेजचा कालावधी संपला असल्याने बँकेस केंद्र शासन/नाबार्ड कडून आर्थिक मदत मिळणार नाही.

(७) रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार ७% CRAR ची पुर्तता बँक करु शकत नाही.

(८) बँक परवान्या अभावी सभासदांकडून ठेवी मिळण्याची शक्यता नाही.

(९) बँकांची नक्त मुल्य उणे असणे व १७ वर्षापासून शेतकऱ्यांना कर्जवाटप बंद असणे.

(३) होय, भुविकास बँकांच्या कर्ज वसुलीच्या रकमेतून व शिखर बँकेकडे उपलब्ध असलेल्या रकमेतून कर्मचाऱ्यांची उपदाने व इतर वैधानिक देणी व थकीत वेतनाची रक्कम अदा करणे, सदर रक्कम कमी पडल्यास मालमत्ता विक्रीतुन उपलब्ध होणाऱ्या रकमेतुन अदा करणे, तसेच बँकेकडून शासनास येणे असलेली रक्कम रु.१८९७.२४ कोटीमध्ये समायोजीत करणे, सन २०१२ मध्ये शिखर बँकेच्या कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या स्वेच्छा निवृत्ती योजनेच्या सुत्रानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करणे व कर्मचाऱ्यांना बँकेच्या सेवेतुन कमी करणे, दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेवणे, इत्यादी प्रकारचे निष्कर्ष काढले आहेत.

(४) भु-विकास बँका अवसायनात काढल्यास शेतकऱ्यांना कर्ज सुविधा देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४२ अन्वये जिल्हा मध्यवर्ती बँकांना मध्यम व दिर्घ मुदतीचा पुरवठा करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकांकडून शेतकऱ्यांना मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करण्यात येतो.

भु-विकास बँकेतील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत सन २०१२ मध्ये शिखर बँकेच्या कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या स्वेच्छा निवृत्ती योजनेच्या सुत्रानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करणे व कर्मचाऱ्यांना बँकेच्या सेवेतून कमी करणे, दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेवणे, अशा प्रकारची भुमिका आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(५) * २२०७२ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५६ टक्के विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली असून अद्यापपर्यंत ४४ टक्के विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०११-१२ मध्ये ७ लक्ष १२ हजार २४०, २०१२-१३ मध्ये १ लक्ष २० हजार ८५४, २०१३-१४ मध्ये १ लक्ष ६१ हजार ३२५ तर सन २०१४-१५ मध्ये ७ लक्ष ३३ हजार ९१ असे एकूण मागील चार वर्षात १७ लक्ष २८ हजार १८० विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षात १६ लक्ष ७६ हजार ९२५ विद्यार्थ्यांपैकी ९ लक्ष ४३ हजार २८४ विद्यार्थ्यांनाच दि. ३१ मार्च, २०१५ रोजी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापैकी अनेक बोगस महाविद्यालयांनी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्ती हडप केल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा बोगस महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य यांच्या कामाची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय, तसेच उर्वरित विद्यार्थ्यांना अद्याप शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात न येण्याची कारणे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सन २०१४-१५ मध्ये एकूण १६,६७,३८२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११,०३,६५२ इतके अर्ज निकाली काढले असून ५,६३,७३० अर्ज प्रलंबित होते.

(४) नाही.

(५) नाही.

प्रलंबित असलेले अर्ज छाननीसाठी महाविद्यालय स्तरावर तसेच जिल्हयाच्या सहायक आयुक्त स्तरावर प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित असलेले अर्ज सन २०१५-१६ मध्ये निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य सहकारी बँकेला झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या**
**नुकसानीची चौकशी करण्याबाबत**

**(६) * १९६५६ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील सुमारे १५०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी प्राधिकृत अधिका-यांनी तत्कालिन संचालकांना दि. २९ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास नोटिसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी किती कालावधीत पूर्ण करण्याबाबत सहकार आयुक्तांनी आदेश दिले आहेत,

(३) उक्त गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) सदर चौकशी पुर्ण करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांना दि. ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत मुदत दिली आहे. सदर प्रकरणी चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(७) * २१३३० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने खोपोली शिळफाटा ते खोपोली गाव यादरम्यान वाहतुकीची कोंडी सातत्याने होत असुन अरुंद रस्त्यामुळे वारंवार अपघात घडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावर अवजड वाहने मोठ्या संख्येने धावत असताना अरुंद रस्त्यामुळे त्याचा फटका सर्वच वाहनधारकांना बसत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या गलथान कारभारामुळे आयआरबीने अद्याप रुंदीकरण केले नाही, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्ता रुंदीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) नाही. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या एकुण ११७ कि.मी. लांबीपैकी बहुतांश भागातील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून पूर्ण करण्यात आले आहे. खोपोली शिळफाटा ते खोपोली

गाव लांबीसह उर्वरित रस्त्याच्या चौपदीकरणाचे काम तसेच उड्डाण पूल, सेवा रस्ते, आदी कामांसाठी केंद्र शासनाने मंजूरी दिली असून पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे निडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील इन्फिनिटी गॅस प्रकल्पाच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत**

**(८) * १८९५० श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निडी (ता.रोहा, जि.रायगड) गावाच्या हद्दीत मुंबई - गोवा महामार्गालगत इन्फिनिटी गॅस प्रायव्हेट लि.कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या कार्बन डायऑक्साईड वायुच्या प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला शासनाची परवानगी नसतानाही प्रकल्पाचे बांधकाम बेकायदेशीररित्या सुरु केले आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, निडी गावापासून २०० मीटरच्या आत हा प्रकल्प असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोकादायक आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) या प्रकल्पाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योग उभारण्यासाठीचे संमतीपत्र (Consent to establishment) दिनांक १९.३.२०१५ रोजी दिलेले आहे. सदर प्रकल्प हिरव्या संवर्गामध्ये मोडत असून या प्रस्तावित प्रकल्पामधून औद्योगिक सांडपाणी, घातक कचरा यांची निर्मिती होणार नसून उत्पादन प्रक्रियेमधून कोणत्याही प्रकारचे प्रदुषित वायू उत्सर्जित होणार नाहीत. सध्या प्रकल्पाचे बांधकाम सुरु असून अद्याप उत्पादन सुरु झालेले नाही.

(३) सदर प्रकल्पाचे उत्पादन अदयापही सुरु न झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोकिसरे (ता.वैभववाडी) येथील उड्डाणपूलाचे काम सुरु करण्याबाबत**

**(९) * १९४८९ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-विजयदुर्ग हा राज्य मार्ग असून कोल्हापूर - गगनबावडा - करुळ घाट - वैभववाडी - तळेरे - विजयदुर्ग या मार्गावर वैभववाडी तालुकयाच्या ठिकाणापासून १.५ किमी अंतरावर कोकिसरे येथे असलेल्या रेल्वे फाटकातून प्रवासी व वाहनचालक जाताना मोठ्या प्रमाणात होणारे अपघात व वाढते मृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी उड्डाणपूल मंजूर होऊन त्याचे सर्वेक्षण झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाचे काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर उड्डाणपूलाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.

रस्त्याच्या कि.मी. ६६/३५० मध्ये प्रस्तावित उड्डाणपूलाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे.

(२) व (३) उड्डाण पूलाच्या कामास रु. ३९४.६९ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. काम राज्य व रेल्वेच्या ५०:५० टक्के सहभागातून करण्यात येणार आहे. उड्डाण पूलाचे काम भारतीय रेल्वे व जोड रस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. पुलाच्या जोड रस्त्यासाठी आवश्यक जमिनीच्या भुसपादनाचे काम महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात येत आहे. भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांचेकडे सादर करण्यात आला असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**परभणी जिल्हा नियोजन विकास योजनेअंतर्गत ई-निविदा प्रक्रियेत लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(१०) * २०३९८ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा नियोजन विकास योजनेअंतर्गत २०१४-१५ या वर्षासाठी मंजुर झालेल्या कामांच्या ई-निविदा प्रक्रियेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात लाखो रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या अधिका-यांना निलंबित करुन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०१५ वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गैरव्यवहाराची सविस्तर माहिती शासनाला दिली असतानाही या प्रकरणी कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, गैरव्यवहार करणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२)
याबाबत, मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांचे दिनांक ३१/३/२०१५ चे पत्र तसेच श्री.सिताराम चिमाजी घनदाट, माजी आमदार यांची दिनांक १९/३/२०१५ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) व (४) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना निर्देश देण्यात आले आहेत.
चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिवराज फाईन आर्टस लिथो वर्क्स येथील**
**कर्मचा-यांना वेतन व इतर लाभ मिळण्याबाबत**

**(११) * २११२७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचा उपक्रम असलेल्या शिवराज फाईन आर्टस लिथो वर्क्स या मुद्रणालयाचे सन १९८४ मध्ये राष्ट्रीयीकरण केल्याने तेथील कर्मचा-यांना वेतन व लाभ मिळणे अपेक्षित असतानाही मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुद्रणालयातील ४५० कामगारांचा न्याय मिळण्याच्या प्रतिक्षेत मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांना २ कोटी रक्कम देणे असल्याने शासनाला सदर मुद्रणालयाची ४५ कोटींची मालमत्ता प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृत्यू झालेल्या ४५० कामगारांच्या वारसांना शासनाकडून मदत देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

मे. शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर या मुद्रणालयाची सुरुवात नागपूर येथील धनवटे कुटुंबियांनी खाजगी स्वरुपात केली होती. तथापि, भागीदारी संस्था, व्यवस्थापन व कामगार यांचेमध्ये कलह (वाद) निर्माण झाल्याने दिनांक १७/५/१९७९ मध्ये मुद्रणालय बंद पडले. त्यामुळे सार्वजनिक हित, बेरोजगार झालेले कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंब व या मुद्रणालयाची कार्यक्षमता या सर्व बाबींचा विचार करुन या मुद्रणालयाचे "दि शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (ॲक्वीझीशन ॲण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकींग) ॲक्ट १९८४" नुसार राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. तेंव्हापासून तेथील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा, १९४८ अंतर्गत वेतन प्रदान करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

शिवराज फाईन आर्टस लिथो वर्क्स,नागपूर हे मुद्रणालय शासकीय मुद्रण संचालनालयाकडे सुपूर्द केल्यानंतर सेवेत असतांना ३० कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे.

(३) शिवराज फाईन आर्टस लिथो वर्क्स, नागपूर या मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार देय असलेले वेतन भत्ते प्रदान करण्यात आले असून त्या अनुषंगाने त्यांना कोणतीही रक्कम देय नाही.

तसेच या मुद्रणालयाचे "दि शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (ॲक्वीझीशन ॲण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकींग) ॲक्ट १९८४ नुसार राष्ट्रीयीकरण करण्यात आले असल्याने मुद्रणालयाची मालमत्ता शासनाकडे निहित आहे. सद्य:स्थितीत सदर मुद्रणालयाचे मुल्यांकन झालेले नाही.

(४) सदर मुद्रणालयाचे व्यवस्थापन दिनांक ६/६/१९९४ पासून मुद्रण संचालनालयाकडे सुपूर्द करण्यात आले आहे. त्यावेळी हजेरी पटावरील कार्यरत ३३० कर्मचाऱ्यांपैकी दिनांक २७/१०/२०१४ पर्यंत ३० कर्मचारी मृत्यू झालेले आहेत. मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना किमान वेतन कायदा १९४८ अंतर्गत अनुज्ञेय सेवा उपदानाची रक्कम व भविष्य निर्वाह निधीची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील शेतक-यांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध शेती योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * १६९६९ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील २० आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतात विविध योजना राबविण्यासाठी मंजूर केलेले ५२ लाख रुपये कंत्राटदार व आदिवासी उपायुक्त यांनी संगनमत करुन, सदर योजनेचा लाभ मेळघाटातील शेतकऱ्यांना न देता चांदूरबाजार येथील शेतकऱ्यांना दिल्याबाबतच्या तक्रारी तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांना माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये अनुसूचित जमातींच्या शेतक-यांसाठी शासनातर्फे शेततळ्याची योजना मंजूर करण्यात आली त्यानुसार मेळघाटातील आदिवासीच्या शेतातील विविध कामासाठी अर्थसहाय्य देण्यात येणे या करिता आदिवासींच्या विकासाकरीता मंजूर निधीतून कागदोपत्री लाभार्थी दाखवीत संबंधित संस्थेकडून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतातील कामे पूर्ण झाल्यावर शासनाकडे अहवाल देणे व पूर्ण झालेल्या योजनेची छायाचित्रे काढून अहवालासोबत देणे आवश्यक असतानाही याबाबत कोणताही पुरावा शासनाकडे दिला नाही तसेच बोगस लाभार्थी दाखवून शासनाकडून अतिरिक्त वाढीव निधी रुपये १३ लाख मंजूर करुन घेतले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मेळघाटातील आदिवासी शेतकऱ्यांच्या योजनेत बोगस लाभार्थी दाखवून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दि. १६/०५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही सद्यस्थितीत सुरु आहे. निवड केलेले २० लाभार्थी हे ता.धारणी व चिखलदरा, जि. अमरावती येथील आहेत.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेसाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त/वाढीव अनुदान मंजुर झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वरील प्रमाणे.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या सर्व बसेसना टोलमधून वगळण्याबाबत

**(१३) * २५५५२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या सर्व बसेसना टोलमधून वगळण्याची घोषणा शासनाने करुन अद्याप (माहे मे, २०१५ अखेर) टोलमुक्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या सर्व बसेसना टोलमधून सवलत देण्याची मागणी, स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी दिनांक १५ जून, २०१५ राजी मा.परिवहन मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या सर्व बसेसना टोलमुक्ती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागातील १९ प्रकल्पांवरील २७ व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या १२ प्रकल्पांवरील २६ अशा एकूण ५३ पथकर स्थानकांवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना दिनांक १ जून २०१५ पासून पथकरातून सूट देण्यात आली आहे,

(२) होय.

मा.परिवहन मंत्री, यांचेकडे सदरचे पत्र दि. १५/६/२०१५ रोजी प्राप्त झाले आहे. मात्र तत्पूर्वीच म्हणजे दिनांक १ जून, २०१५ पासून शासनाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना पथकरातून सूट देण्यात आली आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील वळण मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * २१८११ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण अहमदनगर क्रमांक २२२ या राष्ट्रीय महामार्गावरील तीव्र उतार व अनेक धोकादायक वळणे यामुळे असंख्य अपघात होऊन ६५ जणांना जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावर ये-जा करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षेविषयी प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गावरील वळण दुरुस्त करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३)

या रस्त्यावरील वाहनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने माळशेज घाटामध्ये वळण सुधारणा, मोऱ्यांच्या भिंतींची पुनर्बांधणी, क्रॅश बॅरिअर बसविणे व दरीकडील बाजूला आधार भिंती (रिटेनिंग वॉल) बांधणे अशी रस्ते सुरक्षाविषयक कामे करण्यात आलेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सदर महामार्गावर अपघात घडू नयेत याकरीता माळशेज घाटासह रस्त्यावरील वळणे, उतार तसेच संभाव्य अपघातप्रवण क्षेत्रात वाहन चालकांना धोक्याचा इशारा देणारे फलक ठिकठिकाणी लावण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निवड केलेल्या**
**उमेदवाराची जात प्रमाणपत्रे बनावट असल्याबाबत**

**(१५) * १६८४२ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा मार्फत सन २०१४ मध्ये निवड झालेल्या ४३७ उमेदवारांपैकी २५ उमेदवारांनी उपजिल्हाधिकारी विक्रीकर आयुक्त, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नायब तहसिलदार, मंत्रालय कक्ष अधिकारी, गटविकास अधिकारी आणि उपअधिक्षक-भूमीअभिलेख इत्यादी पदासाठी सादर केलेली जात प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या माहे एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या अनुसूचित जमाती अंतर्गत मन्नेरवारलू व महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या उमेदवाराचा वैध ठरविण्यात आलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची पुर्नछाननी मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच आदिवासी नसतानाही उमेदवारांना आदिवासी प्रमाणपत्रे देणा-या अधिका-यांविरुध्द व बनावट प्रमाणपत्रे सादर करणा-या उमेदवारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच निवड रद्द झालेल्या उमेदवारांच्या जागांवर अन्य उमेदवारांची निवड करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे दि.१५ एप्रिल, २०१५ च्या पत्रानुसार आदिवासी विभागाने दि.२१ एप्रिल, २०१५ अन्वये पाठविलेल्या पत्राच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या उमेदवारापैंकी ४६ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणाची आयुक्त, आदिवासी

संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी छाननी केली. त्यापैकी २५ उमेदवारांच्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जमातीची वैधता प्रमाणपत्रे संशयसास्पद असल्याचे दि.२८ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये त्यांनी कळविले आहे.

(२) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अधिनस्त असलेल्या सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून या प्रकरणांची पुर्नछाननी/पुर्नतपासणी करण्यात येत आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी काही उमेदवारांकडून मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आल्या असून मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २ जुलै, २०१५ रोजी सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने पुढील आकस्मिक व संभाव्यता विचारात घेऊन याचिकाकर्त्यांना तात्पुरत्या स्वरुपात सेवेत रुजू करुन घ्यावे, असे आदेश पारित करुन याचिका निकाली काढलेली आहे. त्यानुसार स्थगिती देण्यात आलेल्या संबंधीत उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद येथील विविध कामांचे ३ हजार ६४८ मेजर बुक (काम मापक पुस्तिका) गहाळ झाल्याबाबत**

**(१६) * १७२८० श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद येथील विविध कामांचे ३ हजार ६४८ मेजर बुक (काम मापक पुस्तिका) गहाळ झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभागातील सर्वाधिक ९७१ मेजर बूक गहाळ झाले असून उप विभाग क्रमांक १ मधील ८३७ मेजरबुक गहाळ झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जालन्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील क्रमांक १ मधील ९८३ मोजमाप पुस्तिका (एमबी) तसेच लातूरच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील ७११ मोजमाप पुस्तिका गायब झाल्यामुळे कोटयवधी रुपयांची बोगस कामे दडपली जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

तथापि, १४५३ मोजमाप पुस्तिका मोजणीसाठी उपलब्ध झाल्या नाहीत. या मोजमाप पुस्तिका ज्या अभियंत्यांकडे/अधिका-यांकडे/कर्मचा-यांकडे उपलब्ध आहेत त्यांना सदर मोजमाप पुस्तिका त्वरीत मोजणीकरीता सादर करण्याबाबत सर्व संबंधित कार्यकारी अभियंत्यांमार्फत सूचित करण्यात आले आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर औरंगाबाद यांच्याकडील ३४६ मोजमाप पुस्तिका व बांधकाम उपविभाग क्र. १ मधील ८३ मोजमाप पुस्तिका मोजणीसाठी उपलब्ध झालेल्या नाहीत. या मोजमाप पुस्तिका त्वरीत मोजणीकरीता सादर करण्याबाबत सर्व संबंधित उप अभियंता/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/कर्मचा-यांना सूचित करण्यात आले आहे.
(३) जालना जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ मधील ७९७ मोजमाप पुस्तिका मोजणीसाठी उपलब्ध झाल्या नाहीत. या मोजमाप पुस्तिका त्वरीत मोजणीकरिता सादर करण्याबाबत सर्व संबंधित कार्यकारी अभियंता/उप अभियंता/ कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ इतर अधिकारी व कर्मचा-यांना सूचित करण्यात आले आहे.
(४) मोजमाप पुस्तिकांचा आढावा घेण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच यामुळे बोगस कामे दडपली गेल्याची शक्यता नाही.

-----------------

**मोहळ तालुक्यातील (जि.सोलापूर) महालक्ष्मी सहकारी दूध उत्पादक संस्थेला मागासवर्गीय संस्था असल्याचे दर्शवून कर्ज देण्यात आल्याबाबत**

**(१७) * २३९३५ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहळ तालुक्यातील (जि.सोलापूर) महालक्ष्मी सहकारी दूध उत्पादक संस्थेला मागासवर्गीय संस्था असल्याचे दाखवून अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून ५ कोटी ५० लक्ष रूपये कर्ज देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली असता या संस्थेचे पदाधिकारी मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीपैकी नसल्याची माहिती माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेचे अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी मराठा वा इतर समाजाचे आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व याप्रकरणी पुढे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सीआयडी, पुणे व आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत सदर प्रकरणाची चौकशी चालू आहे.

-----------------

## राज्यातील संकटग्रस्त शेतक-यांच्या पीककर्जाची फेररचना तीनऐवजी पाच वर्षात करुन व्याजाचा दर कमी करण्याबाबत

**(१८) * १९२४४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संकटग्रस्त शेतक-यांच्या पीककर्जाची फेररचना तीन ऐवजी पाच वर्षात करुन व्याजाचा दर ६% पर्यंत कमी करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २० मे, २०१५ रोजी जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हयातीत सर्वच शेतक-यांना पुणे जिल्हा सहकारी बँकेमार्फत ३ लाख रुपयांचे पिक कर्ज ०% व्याजदाराने देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँकामधून शेतक-यांना पीक कर्ज ०% व्याजदराने देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पीककर्जाची फेररचना तीन ऐवजी पाच वर्षात करुन व्याजाचा दर ६% पर्यंत कमी करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केला हे खरे आहे.

(२) नाही.

मुदतीत पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत

(१) १ लाख पर्यंतचे पीक कर्जासाठी ० % व्याजदर

(२) १ लाख ते ३ लाख पर्यंतचे पीक कर्जासाठी १% व्याज दर आकारला जातो.

(३) मुदतीत पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत

(१) १ लाख पर्यंतचे पीक कर्जासाठी ० % व्याजदर

(२) १ लाख ते ३ लाख पर्यंतचे पीक कर्जासाठी २% व्याज दर आकारला जातो.

(४) लागू नाही.

-----------------

## मेहकर तालुक्यातील ( जि.बुलढाणा) डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(१९) * १९७५९ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील (ता.मेहकर, जि.बुलढाणा) विद्यार्थ्यांना प्यायला आणि आंघोळीला पाणी नसल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी समाजकल्याण विभागाचे आयुक्त यांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय

(२) तसेच उक्त वसतिगृहामध्ये गत तीन वर्षापासून अनागोंदी कारभार सुरु असून तक्रार करुनही कारवाई होत नसल्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.समाजकल्याण मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास बाब १ च्या अनुषंगाने या प्रकरणी गृहपाल व संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले, हे खरे आहे काय व या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची पाण्याची समस्या सोडविण्यात आली आहे काय,

(४) तसेच बाब २ च्या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वसतिगृहांतील समस्यांबाबत असे कोणतेही लेखी निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.

(३) दोन्ही वसतिगृहांतील विद्यार्थ्यांच्या पाण्याची व इतर समस्या सोडविण्यात आलेल्या असून वसतिगृह व्यवस्थित सुरु आहे.

(४) वसतिगृहांतील समस्यांबाबत असे कोणतेही लेखी निवेदन दिल्याचे आढळून न आल्याने चौकशी किंवा कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे आर्णी (जि.यवतमाळ) येथील भगवंत पतसंस्थेत**
**१ कोटी ७ लाख रुपयांचा झालेला अपहार**

**(२०) * २४५६८ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आर्णी (जि.यवतमाळ) येथील भगवंत बिगर शेती सहकारी पतसंस्थेत तब्बल रु.१ कोटी ७ लाखांचा अपहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार श्री. रामदास लक्ष्मण येरावार व ठेवीदारांनी आर्णी पोलीस स्टेशनकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकारात पतसंस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांच्यासह कर्मचा-यांवर अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पतसंस्थेचे अंकेक्षण सहकार खात्याच्या ज्या कर्मचा-यांकडून झाले त्यांनी जाणीवपूर्वक या गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) नाही, सदर प्रकरणी आर्णी पोलिस स्टेशन जि.यवतमाळ येथे श्री. भगवंत बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. आर्णी या पतसंस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या विरुध्द दि. १३.५.२०१५ रोजी एफ.आय.आर. क्र. १६२/१५ दाखल करण्यात आला असून, पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) नाही, माहे मे, २००२ ते २०१२ पर्यंतचे सदर संस्थेचे फेरलेखापरिक्षण लेखापरिक्षक, श्रेणी-२, सहकारी संस्था घाटंजीस जि.यवतमाळ यांच्यामार्फत सुरु आहे. फेरलेखापरिक्षणात दोषी आढळणा-या संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर शहरातील रामनगर ते दाताळा एमआयडीसी**
**या मार्गावरील इरई नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२१) * २२१५४ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील रामनगर ते दाताळा एमआयडीसी या मार्गावरील इरई नदीवर २.५ मीटर अस्तित्वातील बुडीत पुलाऐवजी नवीन उंच पुलाचे बांधकाम करण्यासाठी २४५.०० लक्ष इतक्या किंमतीचे प्राथमिक स्वरुपाचे अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता सा.बा.मंडळ चंद्रपूर यांनी तयार केले असल्याचे लेखी उत्तर मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना कपासू-२०१५/९९/प्र.क्र.३९/नि-१ अन्वये दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम चंद्रपूर शहराच्या विकास आराखडाअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने चंद्रपूर शहर ते एमआयडीसी या मार्गावरील इरई नदीवर उंच पुलाचे बांधकामासाठी निधी उपलब्ध झाला आहे काय व बांधकाम केव्हा पर्यंत सुरु करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी दिनांक २५.९.२०१३ च्या पत्रान्वये प्रश्नाधीन पुलाच्या बांधकामाचे प्राथमिक स्वरुपाचे रुपये २४५०.०० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक " चंद्रपूर शहर पंचशताब्दी महोत्सव" योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले आहे. तथापि त्यास अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही.

प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**नाशिक जिल्हयातील आदिवासी झोपडपट्टीचे**
**आगीमुळे नुकसान झाल्याबाबत**

**(२२) * १८८२५ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सटाणा-देवळा रस्त्यावरील शहरालगतच्या मोरेनगर शिवारातील एकलव्य व अचानक नगरातील आदिवासी झोपडपट्टीस दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत सुमारे ५० झोपड्या जळून खाक झाल्या व धान्य, कपडेलत्ते, रोख रक्कम, फ्रीज, दूरदर्शन संच, किराणा दुकान व संसारोपयोगी साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आले काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(३) तसेच आगीमुळे नुकसान झालेल्या आदिवासी नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. नाशिक जिल्हयातील सटाणा-देवळा रस्त्यावरील शहरालगतच्या मोरेनगर शिवारातील एकलव्य/अचानक नगरातील आदिवासी झोपडपट्टीस दिनांक ३०.४.२०१५ रोजी लागलेल्या आगीत ९७ झोपडया जळून धान्य कपडेलत्ते व संसारोपयोगी वस्तुंचे नुकसान झाले आहे.

(२) होय. सदर आग अकस्मात लागल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले.

(३) आगीमुळे नुकसान झालेल्या नुकसान ग्रस्तांना मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव शहर व तालुक्यातील पतसंस्थांनी अर्थसहाय्य घेवून मुदत संपल्यानंतरही रक्कम शासनास अदा केली नसल्याबाबत

**(२३) * २५२८३ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहर व तालुक्यातील २६ पतसंस्थांनी ८ कोटी ८० लाख ५२ हजार ७२४ रुपये शासकीय अर्थसहाय्य घेवून मुदत संपल्यानंतरही रक्कम शासनास अदा केली नसल्याचे दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थांनी शासनाचे अर्थसहाय्य रक्कम परत न केल्यास महाराष्ट्र जन संग्राम व सामाजिक संघटना सर्व संस्था चालकांच्या विरोधात पोलीसात गुन्हे दाखल करणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार २६ पतसंस्थांनी थकविलेल्या शासकीय अर्थसहाय्याची रक्कम तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दि.३१ मे, २०१५ अखेरपर्यंत जळगांव शहर व तालुकयातील आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या २८ पतसंस्थांकडे शासनास येणे असलेली रक्कम रु. ९,७७,३२,५५० इतकी आहे.

(२) महाराष्ट्र जनसंग्राम व सामाजिक विकास व श्रमिक संघटना यांच्याकडून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्या कार्यालयास कलम ८८ अन्वये जबाबदारी निश्चित केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती मिळण्याबाबत व त्यानुसार दोषींवर कारवाई संस्था करणार असल्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) या संदर्भात २८ पतसंस्थांकडून शिल्लक येणे वसुलीसाठी पुढील प्रमाणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

१. जळगांव तालुक्यासाठी दोन स्वतंत्र वसुली पथकाची नेमणूक करुन वसुली पथकांकडून संस्थांच्या हमीपत्र करुन दिलेल्या/जबाबदर संचालकांच्या जंगम मालमत्ता जप्त करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

२. २८ पतसंस्थांपैकी १० पंतसंस्थांच्या स्वमालकीच्या कलम १०० व नियम ८५ अन्वये संस्थेच्या नावे हस्तांतरीत करण्यात आलेल्या १४ मालमत्तांचा शोध घेवून त्यांच्यावर जप्ती बोजे बसविण्याचे कामकाज करण्यात येत आहे.

३. ज्या १८ पतसंस्थांकडे स्वमालकीची मालमत्ता नाही अशा अर्थसहाय्य मिळण्याकामी हमीपत्र करुन दिलेल्या जबाबदार संचालकांच्या स्वमालकीच्या मालमत्तांचा शोध घेवून त्यांच्या नावे जप्ती बोझे बसविण्याचे कामकाज सुरु आहे.

४. मालमत्तांची वाजवी किंमत निश्चित करुन जाहीर लिलावाने विक्री करण्याचे व त्यातून शासन अर्थसहाय्याचा भरणा करुन घेण्याचे कामकाज सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूरमधील (जि.रत्नागिरी) अर्जुना नदीवर सौंदळ ते राजापूरदरम्यान पूल बांधण्याबाबत

**(२४) * १९६०८ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर मधील (जि.रत्नागिरी) पाचल करक पांगरी ते राजापूरपर्यंत वाहणा-या अर्जुना नदीवर सौंदळ ते राजापूर अशा २० कि.मी दरम्यान कुठेही वाहतूकीसाठी पुल नसल्याने दळणवळणासाठी अत्यंत गैरसोयीचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी व त्यानंतर अनेक वेळा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उक्त पुलास तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

सौंदळ ते राजापूर पर्यंत वाहतुकीसाठी सौंदळ येथील अर्जुना नदीवरील अस्तित्वातील पुलामार्गे व रा.मा.क्र. १५० व रा.मा.क्र. ६६ असे पर्यायी रस्ते उपलब्ध आहेत.

(२), (३), (४) व (५) मागणीकृत पूल गोठणे दोनिवडे आंगले मार्ग ग्रा.मा. ८० या जिल्हास्तरीय रस्त्यावरील असल्याने प्रश्नांकित पुलाचे काम जिल्हा नियोजन समितीची मान्यता, निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे प्रस्तावित राहील.

-----------------

## इगतपुरी तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२५) * १९१६४ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्यातील तहसील कार्यालयासाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या नुतन इमारतीचे बांधकाम निकृष्ट असल्यामुळे महसुल प्रशासनाने इमारत ताब्यात घेण्यास नकार दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट बांधकाम दर्जामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) या प्रकरणी दक्षता पथकाने प्रश्नांकित कामाची पाहणी केली असून निरीक्षणाअंती कामाचा दर्जा सर्वसाधारणपणे समाधानकारक असल्याचे आढळून आले आहे, सद्य: स्थितीत कामाच्या वावानुसार मंजूर अंदाजपत्रकात समाविष्ट असलेली कामे पूर्ण झाली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाभुळगांव (येवला) व रसलपूर (निफाड) शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना साहित्य पुरविण्यात न आल्याबाबत

**(२६) * २३७६५ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या मुलांच्या शासकीय निवासी बाभुळगांव (येवला) व रसलपूर (निफाड) या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शालेय स्टेशनरी, वह्या, क्रमिक पुस्तके इ. शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले तसेच उक्त वर्षात आंघोळीचा साबण, कपड्यांचा साबण, टुथपेस्ट, टुथब्रशही न पुरविल्यामुळे विद्यार्थ्यांना खरुज व मुखदुर्गंधीमुळे पोटाचे विकार झाले असून पालकांनी आपल्या

पाल्यांना शाळेतून काढून नेल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहिले, तसेच शाळांची जुलै, २०१४ ची पटसंख्या कमी झाली, हे खरे आहे काय,
(२) तसेच, विज्ञान प्रयोगशाळेचे साहित्य पुरविण्यात आले नसल्यामुळे वैज्ञानिक प्रयोगांचा पुरेसा सराव न झाल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त बाबींसाठीची प्राप्त तरतूद शासनास परत पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

नाशिक जिल्हयात अनुसूचित जातीच्या मुलांसाठी बाभुळगांव (येवला) व रसलपूर (निफाड) येथे शासकीय निवासी शाळा कार्यरत आहेत. सन २०१४-१५ या वर्षात सदर दोन्ही निवासी शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक शैक्षणिक साहित्य तसेच दैनंदिन गरजेचे साहित्य पुरविण्यात आलेले आहे.

याबाबत, कोणत्याही विद्यार्थ्याने किंवा त्याच्या पालकाने कोणतीही तक्रार केलेली नसून दोन्ही निवासी शाळांतील विद्यार्थी पटसंख्या कमी झाल्याचे आढळून येत नाही.

(२) नाही.

विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोगशाळेचे साहित्य पुरविण्यात आले असून सदर साहित्याचा वापर करुन विद्यार्थ्यांकडून प्रयोगही करवून घेण्यात आले आहेत.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायन पनवेल महामार्गावर आगरवाडी गाव मानखुर्द येथे पादचारी उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(२७) * १९६२७ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन पनवेल महामार्गावर आगरवाडी गाव मानखुर्द येथे पादचारी उड्डाणपूल बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अणुशक्तीनगर यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५

रोजी मा.सहकार तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) व (३) अस्तित्वातील मानखुर्द रेल्वे उड्डाणपुलाच्या रुंदीकरणाच्या व उंची वाढविण्याबाबतचा प्रस्ताव रेल्वे विभागाकडे मंजुरीस्तव पाठविला असून रेल्वे विभागाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पादचारी उड्डाणपुल बांधण्याचे नियोजन आहे.

-----------------

## चेंबुर येथील वसतिगृहांची दयनीय झालेली अवस्था

**(२८) * २००८९ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चु कडू(अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) चेंबुर मधील गरीब विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या वसतिगृहांची गेल्या काही वर्षात समाजकल्याण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाने काहीच डागडूजी न केल्याने सध्या या इमारतीची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चेंबूरमध्ये बेगर्स होम या परिसरात १९९२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने भिका-यांसाठी बांधलेली इमारत काही वर्षांनी समाजकल्याण विभागाकडे शिक्षणासाठी मुंबईत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह करण्यासाठी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून दरवर्षी करोडो रुपयांचा निधी वापरला जातो, मात्र हा निधी या मुलांपर्यंत पोहचतच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, चेंबूर बेगर्स होम परिसरात १९९२ मध्ये बांधलेल्या इमारतीमध्ये पूर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय कार्यरत होते व सध्या तेथे विद्यार्थ्यांचे वसतिगृह कार्यरत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-धुळे राष्ट्रीय महामार्गावर खड्डे पडल्याबाबत

**(२९) * २५१६६ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-धुळे राष्ट्रीय महामार्गावर अनेक दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडले होते यात अनेकांना प्राण गमवावे लागले तर काहींना कायमस्वरुपी अपंगत्व आले याची दखल घेत प्रशासनाने या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे, परंतु खड्डे बुजवताना रस्त्यावरील अनेक खड्डे तसेच सोडण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील खड्डे अंदाजपत्रकानुसार व निकषानुसार बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) अंदाजपत्राकानुसार व निकषानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायन-पनवेल महामार्गाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * २२१८९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गाच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास कॅगच्या अहवालात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार या महामार्गाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) माहे एप्रिल, २०१५ मध्ये कॅगचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये सदर कामात गैरव्यवहार झाला असा निष्कर्ष नाही. तथापि सदर कॅग अहवालात नमूद मुद्दे हे तांत्रिक व प्रशासकीय स्वरुपाचे असून त्याबाबत पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील एका कंपनीने मुस्लीम युवकास नोकरी नाकारल्याबाबत**

**(३१) * १६२९१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हरिकृष्ण एक्स्पोर्ट प्रा.लि. या कंपनीत एका मुस्लीम तरुणाने मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह या पदासाठी अर्ज केला असता सदर कंपनीकडून केवळ बिगर मुस्लीम उमेदवारांचीच नियुक्ती करीत असल्याचा ई-मेल सदर मुस्लीम तरुणाच्या भ्रमण दूरध्वनीवर दिनांक १९ मे, २०१५ रोजी पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब ही भारतीय संविधानाच्या कलम १५ (१) चे उल्लंघन करणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या प्रकरणी सदर कंपनी व कंपनी कर्मचारी यांच्या विरुध्द बीकेसी पोलीस ठाणे गु. र.क्र. ११२/१५, कलम १५३ (ब)(१)(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील आश्रमशाळेतील सुमारे १२०० शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा पगार थकविण्यात आल्याबाबत

**(३२) * १६५५५ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील आश्रमशाळेतील सुमारे १२०० शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा दोन महिन्याचा पगार थकला असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा थकीत पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) सोलापूर जिल्हयात स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या विजाभजच्या ४२ प्राथमिक, ३१ माध्यमिक आश्रमशाळा अशा एकूण ७३ आश्रमशाळा आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मिळून एकूण १३४६ इतके कर्मचारी आहेत. सदर आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना मे, २०१५ अखेरपर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चारोटी नाक्यावर (ता.डहाणू, जि.पालघर) उड्डाणपूलाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * २३९९७ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात मुंबई महामार्गावरील डहाणू तालुक्यात चारोटी नाक्यावर उड्डाणपूल बांधण्यास दिनांक ३० एप्रिल, २००८ मध्ये मंजूरी मिळाली असता व वारंवार मुदतवाढ होऊन देखील सदर बांधकाम रखडल्याने किंवा पूर्ण न झाल्याने चारोटी नाक्यावर १२२ अपघातात ७८ आदिवासी बांधवाचे प्राण गेले, महामार्ग ओलांडताना जीव मुठीत धरुन जावे लागत असल्याचे दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास दिनांक २० फेब्रुवारी, २००९ रोजी सुरुवात करुन ते काम पूर्ण करण्यास ९१२ दिवसाचा मोठा कालावधी होऊनही उड्डाणपूल पूर्ण न झाल्याची कारणे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मनोर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, चारोटी येथील नाक्याच्या जवळच गुलझारी नाला असल्याने उड्डाणपुल बांधण्यात तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्या. त्या अनुषंगाने व स्थानिक आमदार व जनता यांचे मागणीच्या अनुषंगाने अन्य पर्यायांचा अभ्यास करुन पावसाळयानंतर उड्डाणपुलाचे काम सुरु करण्याचे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जातपडताळणी समित्यांच्या पदनिर्मितीला मंजूरी देऊनही समित्या स्थापन न झाल्याबाबत

**(३४) * १७६६४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव),**

**श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हानिहाय जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या कामासाठी २७ नव्या समित्यांच्या पदनिर्मितीला राज्य शासनाने मार्च, २०१५ मध्ये मंजुरी देऊनही सदर समित्या स्थापन न झाल्याने जातवैधता प्रमाणपत्र पडताळणीचे काम बंद झाल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभुमिवर शालेय तसेच महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात जातवैधता प्रमाणपत्रासाठी जिल्हास्तरावर अर्ज आल्याने त्याचा निपटारा करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

शासनाने २७ नविन जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना मान्यता दिलेली नसून, सध्याच्या १५ विभागीय जात प्रमाणपत्र समित्यांऐवजी जिल्हा निहाय ३६ समित्या करण्याचा निर्णय दि. २/३/२०१५ अन्वये घेण्यात आलेला आहे. जिल्हानिहाय समित्यांसाठी पदनिर्मिती प्रस्तावित असल्याने अद्याप सदर समित्या कार्यान्वित झालेल्या नाहीत. तसेच या समित्या स्थापन न झाल्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीचे काम बंद झालेले नाही.

(२) मे, २०१५ अखेर जात प्रमाणपत्र समित्यांकडे ३०,३७५ एवढी शैक्षणिक प्रकरणे प्रलंबित असून,बहुतांशी प्रकरणे त्रुटीमुळे प्रलंबित आहेत.त्यासंदर्भात अर्जदारांना वारंवार संपर्क करुन कळविण्यात आलेले असून, समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी उत्पन्न बाजार समितीने (नवी मुंबई) गाळ्यांचे**
**वाटप करुनही बाजार चालू न केल्याबाबत**

**(३५) * २२३३९ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई (नवी मुंबई स्थित) येथील V वींग मधील अतिरिक्त भाजीपाला बाजारातील सुमारे २८५ गाळेधारकांना लॉटरी पध्दतीने गाळ्यांचे वाटप करुन आणि बाजाराचे उदघाटन करुनही बाजार समितीने बाजार चालू न करता बंद ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळा घेण्यासाठी काढलेले कर्ज व त्याच्या व्याजाने गाळेधारक कर्ज बाजारी झाले असून उक्त बाजार तातडीने चालु करण्यात यावा म्हणून कृषी उत्पन्न व्यापारी वेल्फर असोसिएशने मा.पणन मंत्री, मा.मुख्यमंत्री यांचेकडे वारंवार निवेदने, अर्ज करुन आणि मा.लोकप्रतिनिधीनी माहे मे, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) अद्यापपर्यंत बाजार चालू न करण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त बाजार तातडीने चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीने बाजार बंद ठेवला नसून खरेदीदार तिकडे जात नसल्याने गाळेधारक त्यात विक्री व्यवहार करीत नाहीत.

(२) सदर गाळ्यांमध्ये कृषी उत्पन्न पुरक शेतमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करण्यास परवानगी मागणारी निविदने प्राप्त झाली आहेत.

(३), (४) व (५) उपरोक्त विनंतीची कायद्यातील तरतुदी इत्यादींच्या अनुषंगाने तपासणी सुरु आहे.

-----------------

## नाशिकमधील आदिवासी विकास महामंडळाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३६) * १६६०९ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकमधील आदिवासी विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी भरती प्रक्रियेत ऑनलाईन गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या भरती प्रक्रियेसंदर्भात चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास महामंडळाच्या अखत्यारीतील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत शासन स्तरावर तक्रारी प्राप्त झालेल्या असून, वृत्तपत्रांमध्ये यासंबंधीच्या बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत, ही बाब खरी आहे.

(२) व (३) सदर भरती प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल शासनास सादर करणेबाबतच्या सूचना आदिवासी विकास महामंडळास शासनपत्र दि. ०३.०२.२०१५ व दि.२१.०५.२०१५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळाने दि. ११.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचेमार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार अपर आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांनी महामंडळास सादर केलेला चौकशी अहवाल महामंडळामार्फत दि.०६.०७.२०१५ च्या पत्रान्वये दि.०७.०७.२०१५ रोजी शासनास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालानुसार भरती प्रकरणी अनियमितता किंवा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

-----------------

## लातूर ते नांदेड या राज्यमार्गाला जोडणा-या अहमदपूर ते शिरुर ताजबंद या रस्त्यांची दुरावस्था झाल्याबाबत

**(३७) * २०१८२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर ते नांदेड या राज्यमार्गाला जोडणाऱ्या अहमदपूर ते शिरुर ताजबंद या सुमारे १० किलोमीटर रस्त्यांची दुरवस्था झालेली असून साईड पट्ट्याही खचलेल्या

असल्याने सदरहू रस्त्यावरील खड्डयांमुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढीस लागले असून या रस्त्यावरील दळणवळण करणा-या वाहन चालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू रस्त्यांचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे यासाठी तेथील ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, लातूर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, अहमदपूर जिल्हा इत्यादींकडे मागील २ वर्षापासून सातत्याने मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापी शिरुर ताजबंद-अहमदपूर यां रस्त्यांच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम आजमितीस हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) सदर दुरवस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीचे व डांबरीकरणाचे काम विना विलंब हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) उपरोक्त रस्ता हा केंद्रशासनाचे राजपत्र दि. २२.०३.२०१३ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र ३६१ म्हणून घोषित झाला आहे. डांबरीकरणाच्या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच काम हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदी विशाल विविध कार्यकारी सहकारी संस्थेमध्ये रासायनिक खत व बियाणे वाटपामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) * १९९४३ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी विशाल विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित सिंदी र.नं.२७३, सिंदी (रेल्वे) (ता.सेलू, जि.वर्धा) येथे शेतकऱ्यांकरीता असलेल्या रासायनिक खत व बियाणे वाटपामध्ये संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी नियम बाहय पध्दतीने वाटप केल्याने गैरव्यवहार झाल्याची माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या सुमारास जिल्हा उपनिबंधक

वर्धा व सेलू तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे लोकप्रतिनीधी यांनी तसेच नागरीकांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास संस्थेच्या गोदामातील रासायनिक खते व बियाणेचा साठा कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय

(३) प्राथमिक चौकशीनुसार बियाणे व खत विक्री मध्ये रु. ९,५५,४४०/- रुपयाचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले असुन सदर अपहारास संस्थेचे कर्मचारी श्री. चांदेकर हे जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे संस्थेने त्यांना दि. १५/५/२०१५ पासून निलंबित केलेले आहे. सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाने आदिवासी आश्रमशाळांसाठी प्रथमोपचार पेट्यांची खरेदी केली नसल्याबाबत

**(३९) * २०७८९ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने आदिवासी आश्रमशाळांसाठी गेल्या ३ वर्षापासून प्रथमोपचार पेट्यांची खरेदीच केली नसल्याने सुमारे ५ लाख विद्यार्थी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत असल्याची माहिती दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांमध्ये प्रथमोपचाराअभावी गेल्या १० वर्षात ७९३ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागाने प्रथमोपचार पेटयांची खरेदी न करण्याची कारणे काय आहेत, तसेच आतापर्यंत प्रथमोपचार पेटयांची खरेदी केली आहे काय ?

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधीतांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

राज्यात आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय आश्रमशाळेसाठी शैक्षणिक वर्ष सन २०१२-१३ करीता प्रथमोपचार पेट्यांची खरेदी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी व्हावी व त्यांना वेळीच वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०९६/१५३०/प्रक्र३०४/आरोग्य-४ दिनांक २५ मार्च, १९९८ अन्वये वैद्यकीय पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर पथकांचे कामकाज ग्रामिण/कुटीर रुग्णालय/जिल्हा रुग्णालय यांच्या अधिपत्याखाली सुरु आहे. या वैद्यकीय पथकामार्फत शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची दरमहा नियमित आरोग्य तपासणी करणे, तीन महिन्यातून एकदा प्रत्येक विद्यार्थ्यांची सखोल वैद्यकीय तपासणी करणे, विद्यार्थ्यांचे हेल्थकार्ड ठेवणे, संदर्भ सेवा आवश्यक असल्यास पुढील तपासणीसाठी तालुका/जिल्हा रुग्णालयाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा करणे, विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना आरोग्य विषयक प्रशिक्षण देणे, पिण्याच्या पाण्याची तपासणी करणे, शाळेच्या परिसराची पाहणी करुन आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक बाबी असल्यास कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून योग्य ती सुधारणा, दुरुस्ती करण्यास सांगणे, स्वयंपाक्याची आरोग्य तपासणी, वैयक्तीक स्वच्छता, परिसर स्वच्छता, प्रथमोपचाराचे प्रशिक्षण इत्यादी कामे करण्यात येत आहेत.

यापूर्वी शासकीय आश्रमशाळांसाठी शैक्षणिक वर्ष सन २०१२-१३ करीता प्रथमोपचार पेट्यांची खरेदी केलेली आहे.

-----------------

## आचरा व देवगड आडबंदर (ता.मालवण जि. सिंधुदुर्ग) दरम्यानच्या खाडीवर पूल बांधण्याबाबत

**(४०) * २०३४६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील आचरा व देवगड तालुक्यातील

आडबंदर दरम्यानच्या खाडीवर पूल व आचरा बंदर ते वांयगणी-तोंडवली-तळाशील पर्यंत समुद्राच्या काठाने नवीन रस्ता करण्यात यावा म्हणून आडबंदर तसेच त्या परिसरातील ग्रामस्थांनी मे २०१४ व मागील १० वर्षापासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कणकवली आदीकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू मागणी केलेला पूल व आचराबंदर ते तळाशील पर्यंतचा रस्ता हा संपूर्णतः समुद्राच्या काठाने जाणार असल्याने स्थानिक लोकांच्या दैनंदीन व्यवहारासाठी तसेच पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने सदरहू मागणी लवकरात लवकर मंजूर होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) संबंधित निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) मागणीकृत पूल हा प्र.रा.मा. ४ वरील अस्तित्वातील पुलापासून सुमारे २ कि.मी. अंतरात आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन खाडी पूल बांधणे व्यवहार्य होणार नाही.

तसेच आचरा बंदर ते तळाशील हा रस्ता योजनाबाह्य असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

-----------------

## नागपूर-जबलपूर महामार्गावरील कन्हान (जि.नागपूर) नदीवरील पूल नादुरुस्त झाल्याबाबत

**(४१) * २२३७८ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा व वाहतुकीचा महत्वपूर्ण असलेल्या नागपूर-जबलपूर महामार्गावरील कन्हान नदीवरील (जि.नागपूर) पूलाला १४१ वर्ष झाली असून तो आता नादुरुस्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलावरील अपघाताचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरिता नविन पुलाचे काम सुरू करण्यात येऊन ३३ महिन्यात सदर पूलाचे काम पूर्ण करण्याचे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय,

(४) असे असतानाही या पूलाचे काम अत्यंत धीम्या गतीने करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) नाही.
(३) होय.

सदर पुलाचे वयोमान झालेले असल्यामुळे व वाहतूक वर्दळ मोठया प्रमाणात वाढलेली असल्यामुळे नविन पुलाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.
(४) पूलाचे पोचमार्गाची जागा ताब्यात न आल्यामुळे पूलाचे काम सुरु करण्यास विलंब झाला आहे. परंतू सद्य:स्थितीत पूलाचे बांधकाम सुरु असून विहित मुदतीत पूलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कारवा (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दूषित पाण्यामुळे विषबाधा झाल्याबाबत**

**(४२) * १८६८८ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारवा (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील आश्रम शाळेतील तब्बल ४० विद्यार्थ्यांनी जीर्ण अवस्थेतील विहिरीतील पाणी पिल्यामुळे विषबाधा झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विहिरीतील दूषीत पाणी पिल्यामुळे एका विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढ्ळून आले,
(४) असल्यास, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शुध्द पाणी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत चंद्रपूर जिल्हयात ३० विजाभज आश्रमशाळा कार्यरत आहेत. त्यापैकी विजाभज आश्रमशाळा कारवा ता. जि. चंद्रपूर येथील गणेश रुस्तम शिंदे विद्यार्थ्याचा दि.११.०४.२०१५ रोजी पोटदुखी व उलटीमुळे मृत्यु झाला असून सदर विद्यार्थ्याचा मृत्यु अशुध्द पाण्याने झाल्याचे ग्रामीण रुग्णालयातील बल्लारपूर येथील डॉक्टरांनी प्रथम दर्शनी उपचारा दरम्यान सांगितले होते.त्या अनुषंगाने सदर शाळेतील पिण्याच्या पाण्याचे नमुने जिल्हा सार्वजनिक आरोग्य केंद्र, चंद्रपूर येथे पाठविण्यात आले. सदर प्रयोगशाळेने संबंधित आश्रमशाळेच्या पाणी नमुन्याच्या सुक्ष्मजीव अहवालात सदरील पाणी पिण्यास योग्य असल्याबाबतचे कळविले आहे. तसेच शवविच्छेदन अहवालात डॉक्टारांनी मृत्युचे कारण विसेरा तपासणी नंतरच निश्चित होईल.

(३) सदर विद्यार्थ्याचा विसेरा तपासणी करीता नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविल्याचे पोलीस निरिक्षक बल्लारपूर पोलीस स्टेशन यांनी सांगितले आहे, अद्याप अहवाल अप्राप्त असल्याने मृत्युचे कारण स्पष्ट झालेले नाही.

(४) चंद्रपूर जिल्हयातील सर्व विजाभज आश्रमशाळांमधील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासून घेतलेले आहे व सदर शाळांमधील पिण्याचे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत संबंधित विभागाने प्रमाणपत्र दिलेले आहेत. तसेच सर्व विजाभज आश्रमशाळांना पिण्याच्या पाण्यासाठी युव्ही फिल्टर बसविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील पूलावरील टोलवसुली बंद करण्याबाबत

**(४३) * १८३८३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील रायगड जिल्ह्यातील महाड येथे पूल बांधून २० वर्ष उलटून गेली तरी टोल वसुली सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोलवसुलीचा वाहनचालकांना व प्रवाशांना नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टोलवसुलीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सावित्री नदीवरील बांधलेल्या या पूलाकरिता सुरु असलेली टोल वसुली केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार दि. ०२.०७.२०१५ रोजी, रात्री १२.०० वाजल्यापासून बंद करण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था मर्या. या संस्थेस बेकायदेशीरपणे कर्ज दिल्याबाबत

**(४४) * २३१५९ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था मर्या. या संस्थेस दि. ५ जानेवारी २०१३ ते दि. १६ मे २०१३ या कालावधीत सहकारी संस्था कायद्याचे उल्लंघन करुन देय मर्यादेपेक्षा जास्त बेकायदेशीर कर्ज आयत्यावेळच्या विषयात मंजूर करुन बँकेची आर्थिक लूट केल्याप्रकारणी संचालक मंडळाच्या अध्यक्षांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी दिरंगाई केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर संस्थेला दिलेले ७४६ लाख रुपये कर्ज व व्याज थकीत असूनही बँकेकडून वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) उक्त गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८८ नुसार जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. २७ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने संस्थेसे दिलेल्या कर्ज प्रकरणातील अनियमिततेमुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०४.१२.२०१३ रोजी चौकशीचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या स्तरावरुन सिक्युरटायझेनशन ॲक्ट अंतर्गत कार्यवाही सुरु केली आहे.

(३) व (४) बँकेने संस्थेस दिलेल्या कर्ज प्रकरणातील अनियमिततेमुळे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये, दिनांक ०४.१२.२०१३ रोजी चौकशीचे आदेश निर्गमित केलेले होते.

तथापि, तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांचे कडील दिनांक २५.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वय कलम ८३ अन्वये केलेला चौकशी अहवाल रद्द केलेला आहे. सबब, पुढील कारवाई करता आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास विभागाने काळ्या यादीमध्ये टाकलेल्या**
**कंत्राटदारास चिक्की पुरवठ्याचे आदेश दिल्याबाबत**

**(४५) * १६६५७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च न्यायालयाचा नागपूर खंडपिठाने दिलेल्या आदेशानंतर यापुढे राखीव वस्तूची साहित्यांची दरनिश्चिती करता येणार नाही असा निर्णय दिला असतांना सुध्दा आदिवासी विकास विभागाने काळ्या यादीत टाकलेल्या व आरोप केलेल्या पुरवठादार कंपनी/कंत्राटदार यास १२३ कोटी रुपयांचे चिक्की पुरवठ्याचे खरेदीचे आदेश दिल्यामुळे अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहारातून करोडोचे गैरप्रकार झाले असल्याची माहिती दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहारामधून साहित्य खरेदीच्या फाईल नियमबाह्य व बेकायदेशिर अति जलद गतीने फिरुन मार्केट रेटपेक्षाही दामदुप्पटीने जास्त दराने साहित्याची खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काळ्या यादीमध्ये टाकलेल्या कंत्राटदाराकडून साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तसेच दोषी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत कोणत्याही चिक्की पुरवठ्याचे खरेदीचे आदेश देण्यात आलेले नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रुपी सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांकरिता स्वेच्छा निवृत्ती योजना लागू करण्याबाबत

**(४६) * २५५०० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला),श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुपी सहकारी बँकेवरील आर्थिक निर्बंधाला सव्वादोन वर्ष झाल्यानंतरही बँकेचे विलीनकरण न झाल्यामुळे या बँकेत १४०० कोटी रुपये ठेवलेल्या सव्वासहा लाख ठेवीदारांमध्ये, कर्मचा-यांमध्ये अस्वस्थतेची भावना निर्माण झाली असल्याची बाब मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) रुपी बँकेला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून ओटीएसची तसेच कर्मचा-यांसाठी स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करण्याची परवानगी मिळविण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) रुपी को ऑप बँक लि. पुणे या बँकेला एकरकमी कर्ज परतफेड योजना राबविण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दि.२६.०६.२०१५ च्या पत्रान्वये सहकार आयुक्त/राज्य सरकार यांची पुर्व परवानगी घेण्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे सदर मान्यतेच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक यांनी पाठविलेला प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यासंदर्भात शासनामार्फत कार्यवाही सुरु आहे.

सदर बँकेतील कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छासेवा निवृत्ती योजनेबाबत अंतिम निर्णय भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अद्याप प्राप्त झाला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडपे-कसारा-शहापूर (जि.ठाणे) या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४७) * २०७४१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडपे-कसारा-शहापूर (जि.ठाणे) या महामार्गाचे काम बी.ओ.टी. तत्वावर मे.गॅमन इंडिया प्रा.लि. कंपनीला दिले असून गॅमन कंपनीने सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले असल्याने तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्ता खराब झाला असून अपघाताचे प्रमाण वाढल्याने सदर निकृष्ट दर्जाचे कामांचे गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी करुन कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वडपे-कसारा-शहापूर या रस्त्यांचे काम पूर्ण झालेले नसतानाही मे.गॅमन इंडिया प्रा.लि. कंपनीने मौजे पडघा येथे टोलनाका सुरु केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित कंपनीविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर काम भारतीय रस्ते काँग्रेसच्या मानकानुसार केलेले आहे, परंतु अतिवृष्टीमुळे या घाट भागातील रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी खराब झाला आहे, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-सांगली रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(४८) * २२०३१ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-सांगली रस्त्यांसंदर्भात पालकमंत्र्यांनी आढावा बैठका घेऊन पावसाळ्यापूर्वी चौपदरीकरण पूर्ण करण्याच्या सूचना सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापी तमदलगे, उदगांव, शिरोली येथील छोट्या पुलांची कामे पूर्ण झाली नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौपदरीकरणाचे काम प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,

(४) याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर काम तात्काळ पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे वा आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय, अंशत: खरे आहे. तमदलगे येथे किमी १/०० (सुधारित किमी ०/९७३) व उदगांव येथे किमी १२/१७५ (सुधारित किमी १२/१०७) येथील पूलांची कामे अपूर्ण आहेत. शिरोली हद्दीतील पुलाची कामे पूर्ण आहेत.

(३) उद्योजकाकडून कामाची गती संथ राखल्यामुळे या प्रकल्पाचे काही काम प्रलंबित आहे. याबाबत उद्योजकाविरुध्द निविदा शर्त क्र ९.२ (c) अन्वये नुकसान भरपाईची कार्यवाही चालू करण्यात आली आहे.

(४) कामाच्या प्रगतीबाबत वेळोवेळी उद्योजकाबरोबर, मा.मंत्री महोदय यांनी दिनांक २२.११.२०१४, दिनांक ७.२.२०१५ व दिनांक १४.४.२०१५ रोजी बैठका घेऊन पाठपुरावा केलेला आहे. तसेच सुकाणू समितीच्या सा.बा.प्रादेशिक विभाग, पुणे येथे वेळोवेळी कामाचा पाठपुरावा करणेसाठी बैठका घेतलेल्या आहेत. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, कोल्हापूर व कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, कोल्हापूर यांनी बैठका घेऊन पाठपुरावा केलेला आहे व माहे ऑक्टोबर-२०१५ अखेर काम पूर्ण करण्याच्या सूचना उद्योजकास दिल्या आहेत.

(५) उर्वरित काम त्वरित पुर्ण करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावरील वरखेडे फाट्यानजीक धोकादायक वळणामुळे अपघात होत असल्याबाबत

**(४९) * १६४७९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गावरील पांझरेच्या पुलाजवळील वरखेडे फाटा नजीक धोकादायक वळण असून त्या ठिकणी रेडीयमच्या खुणा असलेले सूचना फलक नसल्याने व विजेच्या खांबावरील दिवे चालू नसल्याने बऱ्याचदा अंधारात अपघात होवून अनेकांना जीव गमवावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सूचना फलक व विजेच्या खांबावरील दिवे सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) दिवे सुस्थितीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील कोर्ट रोडचे सुरू असलेले**
**काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५०) * १७१८८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील कोर्ट रोडचे सुरू असलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात येऊन या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याबाबतच्या नागरीकांनी संबंधितांकडे वारंवार तक्रारी केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याचे काम दर्जेदार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे. अशा स्वरुपाचा एक तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झालेला आहे.

(२) होय.

(३) संबंधीत कामांच्या गुणवत्तेच्या दर्जाची तपासणी करण्याकरीता प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांना दि. २६.०६.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आदेशीत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी**
**पुलाच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(५१) * १७९३७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी पुलाच्या रुंदीकरणाच्या

आराखडयास रेल्वे प्रशासनाने एप्रिल २०१५ च्या शेवटच्या आठवडयात मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उपरोक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सदर पुलाच्या रेल्वे विभागाने मंजूर केलेल्या नकाशानुसार अस्तित्वातील रेल्वे पुलाच्या दोन्ही बाजूस २ + २ मार्गीकेकरीता रुंदीकरण करणे व अस्तीत्वातील रेल्वे पुलाच्या २ + २ मार्गीकांचे निष्कासन करुन पुलाच्या उंचीमध्ये पूर्वी पेक्षा ०.८५ मीटर उंचीने वाढ करुन पुनर्बांधणी करणे असा वाव आहे.

सदर पुलाच्या मंजूर नकाशानुसार कामाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगोली गेट (नांदेड शहर) येथे बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलाच्या कामाची मूळ निविदाची रक्कम ठरविल्याबाबत**

**(५२) * २४३५० श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली गेट (नांदेड शहर) येथे बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलाच्या कामाची मूळ निविदाची रक्कम १७.८५ कोटी एवढी ठरविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाची रक्कम ठरलेली असताना कामासाठी ३४ कोटी ३७ लक्ष रुपये खर्च दाखविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलाच्या कामासाठी २२ कोटी २ लक्ष रक्कमेची निविदा काढण्यामागची कारणे काय आहेत,

(४) सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात काय आढळून आले, असल्यास दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) (१) सदर कामासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार रु.१७.८५ कोटीची निविदा काढण्यात आली होती.

(२) या कामासाठी मे.आर. एस.व्ही. सी.पी. एल.ॲड पी.व्ही.राव या ठेकेदाराची रु.२२.५९ कोटी या किंमतीची निविदा निम्नतम ठरली असून ती मूळ निविदा किंमतीपेक्षा २६.५५ टक्क्याने जास्तीची होती.

(३) वाटाघाटी अंती स्वीकृत करण्यात आलेला मे.आर. एस.व्ही. सी.पी. एल.ॲड पी.व्ही.राव यांचा सुधारित देकार रु.२२.०४ कोटीचा असून तो मूळ निविदा किंमतीपेक्षा २३.४९ टक्क्याने जास्तीचा होता.

(४) पुलाचे काम सन २००९ मध्ये पूर्ण झाले असून पुल वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

(४) सदरहू पुलाच्या कामाची चौकशी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०५.०४.२०१३ च्या पत्रान्वये अप्पर आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून करण्यात आली आहे.

(५) चौकशी अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यात दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या मदतनिधी वितरणास विलंब होत असल्याबाबत**

**(५३) * १७०९१ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धर्माबादकडे ९ कोटी रुपये माहे मार्च, २०१४ च्या पहिल्या आठवड्यातच वर्ग केले आहेत परंतू ही रक्कम तातडीने शेतकरी वर्गास वाटप करणे अशक्य असल्यामुळे सदर वाटपासाठी बँकेला अधिक कालावधी लागणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी उक्त बँकेकडे शासनाने वर्ग केला असून ५६ गावांना तातडीने ८ ते १५ दिवसात आर्थिक मदत करण्याबाबत प्रश्न निर्माण झाला असून अन्य बँकांमध्ये दुष्काळग्रस्तांची खाते असतानाही केवळ एकाच बँकेकडे शासनाने

दुष्काळ निधी वर्ग केल्याने सदरहू निधी दुष्काळग्रस्तांना वेळेते मिळण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

तहसिल कार्यालय, धर्माबाद यांचेकडून तालुकयातील एकूण २३३९३ दुष्काळग्रस्त शेतक-यांना वाटप करणेसाठी रु. ९.९२ कोटी बँकेस दि. १७.३.२०१५ पर्यंत टप्प्याटप्प्याने प्राप्त झालेली आहे.

(२) नाही.

धर्माबाद तालुक्यातील ५६ गावातील २३३९३ लाभार्थ्यांना वाटपासाठी रु. ९.९२ कोटी प्राप्त असून ५३ गावातील बाधीत शेतक-यांना रु. ८.०५ कोटीचे वाटप करण्यात आले असून उर्वरित ३ गावातील शेतक-यांना २ ते ३ दिवसात वाटप करण्याचे काम पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) दरम्यानचे कालावधीमध्ये करंसी चेस्ट मधून आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध न झाल्यामुळे वाटपास विलंब झालेला आहे.

-----------------

**यशदा संस्थेने आश्रमशाळांची पाहणी करुन**
**अहवाल सादर केल्याबाबत**

**(५४) * १८००० डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश**

**मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७१ आश्रमशाळांची पाहणी करुन त्या संदर्भातील शिफारसींचा अहवाल 'यशदा' संस्थेने नुकताच शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालातील शिफारसींचे स्वरुप काय आहे व त्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाय योजना केल्या आहेत,

(३)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) यशदा या संस्थेने आदिवासी विभागाच्या मराठवाडयातील ७१ आश्रमशाळांची पाहणी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

सादर अहवालातील शिफारशी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे आहेत.

१. आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारणे

२. आश्रमशाळेमध्ये मुलींची संख्या वाढविणे. स्त्री अधिक्षिकांची नेमणूक करणे.

३. शिक्षकांच्या रिक्त जागांची भरती करणे.

४. पाणी व स्वच्छतेच्या सुविधा पुरेशा प्रमाणात पुरविणे.

५. जेवणाचा दर्जा वाढविणे.

६. गळतीचे प्रमाण कमी करणे.

७. मुलांचा खेळातील सहभाग वाढविणे इत्यादी.

सदर अहवालातील शिफारशींचे अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांचे दि. १६/०१/२०१५ चे पत्रान्वये सविस्तर अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आदिवासी विकास विभागामार्फत वॉश (WASH- Water,sanitation and Hygiene) हा कार्यक्रम सुरु केलेला आहे. स्वतंत्र शिक्षण कक्ष स्थापन केलेला आहे. शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया अपर आयुक्त स्तरावर सुरु आहे. जेवणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर (मुंढेगाव,जि.नाशिक) व (कांबळगांव, जि. पालघर) येथे मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात येत आहे.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत मंजूर वसतिगृहे बोगस असल्याबाबत

**(५५) * २२३१८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या वसतीगृहापैकी २५ वसतीगृहे बोगस आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० पासून संस्था अस्तित्वात नसतानाही वसतीगृहे हस्तांतरित करुन ती वसतिगृहे सुरु असल्याचे दाखवून परिपोषण अनुदान, कर्मचारी मानधन व इमारत भाडे रक्कम यामध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस वसतीगृहाच्या यादीत करमाळा तालुक्यातील सावित्रीबाई फुले, करमाळा वसतीगृह, मागासवर्गीय वसतीगृह यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन तपासणी बाबतचा अहवाल मागवावा अशी लेखी तक्रार दिली गेली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जि.प. सोलापूर अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांपैकी २५ वसतिगृहे बोगस असल्याची तक्रार श्री.शिवाजी कांबळे, माजी सभापती, समाजकल्याण समिती, जि.प.सोलापूर यांनी अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर यांचेकडे दाखल केलेली होती. त्यानुसार, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.सोलापूर कार्यालयाने दि.१८/०६/२०१५ व दि. २५/०६/२०१५ रोजी संबंधित वसतिगृहांचे शिबीर आयोजित करुन त्यांचेकडून वसतिगृह मान्यता, विद्यार्थी मान्य संख्या, वाढ मान्यता, कर्मचारी मान्यता, हस्तांतर-स्थलांतर संबंधित कागदपत्रे संकलित करण्यात आलेली आहेत.

सद्यस्थितीत, अनुदानित वसतिगृह चालविणाऱ्या संस्थांकडून प्राप्त कागदपत्रांची तपासणी जिल्हा परिषद स्तरावर सुरु असून तपासणी पूर्ण झाल्यावरच याबाबत निष्कर्ष काढता येईल.

(४) अशी कोणतीही तक्रार किंवा निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) वसतिगृहांच्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती विभागातील शासकीय आदिवासी आश्रमशाळामध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(५६) * १७२६३ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील शासकीय आदिवासी आश्रमशाळामध्ये शिक्षकांची १८०९ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या रिक्त पदामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले वा होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे. आदिवासी विभागांतर्गत अमरावती विभागात शिक्षकांची १२९१ पदे मंजूर असून त्यापैकी २५४ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी काही ठिकाणी तासिका पध्दतीने शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. तर काही ठिकाणी अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. शिक्षक भरती बाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे भाव घटल्यामुळे साखर कारखानदारी अडचणीत आल्याबाबत

**(५७) * १८१२६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा),श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे भाव घटल्यामुळे राज्यातील साखर कारखानदारी मोठ्या संकटात सापडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे एफआरपीनुसार ऊसाला भाव देणे कारखान्यांना अवघड झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संकटातल्या कारखान्यांना आर्थिक अडचणींतून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने ५० लाख टन साखरेचा बफर स्टॉक करावा तसेच ऊसाच्या हमी भावाप्रमाणेच साखरेलाही हमीभाव द्यावा अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने केंद्र शासनाने राज्य शासनाला आतापर्यंत कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

सन २०१४-१५ च्या हंगामाचे सुरुवातीस प्रतिक्विंटल रु. २६००-२७०० प्रमाणे साखरेला असणारा दर सद्यस्थितीत प्रतिक्विंटल रु.२१००-२२००/- पर्यंत घटलेला आहे. त्यामुळे निधी उपलब्धतेच्या अडचणीमुळे राज्यातील साखर उद्योग आर्थिक संकटात सापडलेला आहे.

(२) होय

देशात तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात सातत्याने साखरेचे दर तसेच उपपदार्थ जसे मोलॅसिस, बगॅस, स्पिरीट एस.डी. इत्यादीचे दरही कमी झालेले आहेत. त्यामुळे निधी उपलब्धतेच्या अडचणीमुळे साखर कारखान्यांना FRP प्रमाणे दर देणे अवघड झाले आहे.

(३) राज्यातील साखर उद्योगास आर्थिक सहाय्य देण्यासाठी दि.१०/४/२०१५ आणि दि. १५/०४/२०१५ चे पत्रान्वये मा.प्रंतप्रधान आणि मा.केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना कच्च्या साखर निर्यातीस अनुदान, अबकारी कर्ज, कच्च्या साखरेच्या आयात शुल्कात वाढ, इथेनॉल मिश्रण कार्यक्रम, बफर स्टॉक निर्मिती, मुदत कर्जाची पुनर्रचना, ऊस विकास निधी (SDF) इत्यादि मुद्दयांबाबत धोरणात्मक निर्णय होणेस विनंती केली आहे.

(४) केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यातील साखर उद्योगास खालील प्रमाणे मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे.

(१) राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या हंगामामधील ऊस खरेदी कर माफ कलेला आहे.

(२) केंद्र शासनाने दि. २७/२/२०१५ च्या अधिसुचनेनुसार १४ लाख मे.टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रतिमेटन रु. ४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे. तर राज्य शासनाने रु. १०००/- प्रमाणे निर्यात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) केंद्र शासनाने सन २०१४-१५ साठी रु.६०००/- कोटीचे पॅकेज जाहीर केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे खामगांव (ता.बार्शी, जि.सोलापूर ) येथील आर्यन शुगर कंपनीने ऊस उत्पादन शेतक-यांना खोटे चेक देऊन फसवणूक केल्याबाबत**

**(५८) * १९७२६ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खामगांव (ता.बार्शी, जि.सोलापूर ) येथील आर्यन शुगर कंपनीने ऊस उत्पादन शेतक-यांना खोटे चेक देऊन फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवड्यात वा त्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कारखान्याच्या संबंधित अधिका-यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित शेतकरी संघटनेने बार्शी तहसलिदार, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक १०/०५/२०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे, अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेच्या दि. ०६/०५/२०१५ व दि. १५/०५/२०१५ च्या निवेदनाद्वारे निदर्शनास आले आहे.

(२) जनहित शेतकरी संघटनेने दि. ०६/०५/२०१५ व दि. १५/०५/२०१५ च्या निवेदनाद्वारे आयुक्त, साखर, जिल्हाधिकारी, सोलापूर व तहसिलदार, ता.बार्शी यांचेकडे फसवणुकीचा गुन्हा संबंधितांवर दाखल करण्याची मागणी केलेली आहे.

(३) आर्यन शुगर्स लि., खामगांव, ता.बार्शी, जि. सोलापूर या कारखान्याकडे हंगाम २०१४-१५ मधील एफ.आर.पी. दराप्रमाणे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना देय बाकी असलेली ऊसाची किंमत रु. २१,१३,५२,६९६/- (अक्षरी रुपये एकवीस कोटी तेरा लाख बावन्न हजार सहाशे शहाण्णव फक्त) तसेच ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ चे कलम ३(८) मधील तरतुदी नुसार व कलम ३(३ए) नुसार त्यावर विहीतदराने देय होणारे व्याज ही रक्कम जमिन महसुलाची थकबाकी समजून आर्यन शुगर लि., खामगांव, दिलीपनगर, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे स्वत:चे स्थावर व जंगम मालमत्तेची विक्री करुन रक्कम वसुल करण्यात यावी व या रक्कमेतून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना ऊस (नियंत्रण) आदेशातील तरतुदीनुसार देयबाकीची रक्कम खात्री करुन संबंधितांना अदा करणेसाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आर.आर.सी. आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार पुढील वसुलीची कार्यवाही तहसिलदार, बार्शी यांचे मार्फत सुरु आहे.

-----------------

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्रं-३ वर सर्व्हीस रोड नसल्याने अपघात होत असल्याबाबत

**(५९) * १९५७७ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्रं-३ वर सर्व्हीस रोड तसेच ॲप्रोच रोड वर वळण मार्ग नाही हे खरे आहे काय,

(२)असल्यास, त्यामुळे या चौपदरी रस्त्यामुळे वळायला मार्ग नसल्याने बसचे अपघात होउन ब-याच नागरिकांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आंबडवे (ता. दापोली जि.रत्नागिरी) येथे शिल्पवृष्टी स्थापन करण्याबाबत**

**(६०) * १७५७४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ गाव आंबडवे ( ता.दापोली , जि.रत्नागिरी ) येथे ५ कोटी रुपये खर्च करून शिल्पवृष्टी स्थापन करण्याचा निर्णय सन २००९ मध्ये घेण्यात आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या आंबडवे गाव दुर्लक्षित असून उक्त शिल्पवृष्टी विकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर शिल्पवृष्टीच्या कामाचे नमुना आराखडे उपलब्ध नसल्याने सा.बां.विभागाने सदर काम सुरु केलेले नाही.

प्रस्तुत प्रश्न हा अनेक विभागांशी निगडीत असल्याने, सर्व संबधित विभागांची एकत्रित बैठक घेवुन, हा प्रश्न तातडीने सोडविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**धारावी, मुंबई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्याबाबत**

**(६१) * १६७२४ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हयातील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असून मुंबई शहर जिल्हयांतील अनुसूचित जातीसाठी आरक्षित धारावी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्यात यावे, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) प्रत्येक जिल्हयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्याबाबतचा निर्णय दिनांक १ जून, २००६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार मुंबई येथील सामाजिक न्याय भवानाचे बांधकाम चेंबूर येथील भिक्षेकरीगृहाच्या भूखंडावर बी.ओ.टी. तत्वावर बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे धारावी येथे वेगळे सामाजिक न्याय भवन बांधण्याची बाब विचाराधीन नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समाजकल्याण विभागाकडून दलित वस्त्यांमध्ये राबविल्या जात असलेल्या सौरपथ दिव्यांच्या योजनेबाबत

**(६२) * १८१५९ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ च्या योजनेनुसार चार वर्षात १ लाख ९३ हजार २४२ सौरदिवे बसविण्याचे नियोजन समाजकल्याण विभागाने हाती घेतले असून सदर योजना ३४० कोटी रुपयांची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेकरिता निविदा बोलावून ठेकेदार नेमण्याचे धोरण असताना समाजकल्याण विभागाने महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाकडून (मेडा) रेट कॉन्ट्रॅक्ट वरिल पुरवठादारांची यादी मागवून पाच ठेकेदार नियुक्त केल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठेकेदारांना कोणत्या निकषानुसार नियुक्त करण्यात आले आहे, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, व तदनुसार याबाबत दोषी असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) व (३) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत सन २०१३-१४ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता दलित वस्त्यांमध्ये पथदिवे पुरवठा करुन स्थापित करणेबाबत महाराष्ट्र उर्जा विकास संस्था (मेडा) यांच्या दरकरारावर नोंदविण्यात आलेल्या पुरवठा धारकास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सौर पथदिव्यांबाबतच्या प्राप्त तक्रारीनुषंगाने संबंधित पुरवठा धारकास नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त, उपायुक्त, व सहायक आयुक्त यांना तसेच प्रत्येक जिल्ह्यातील १० वस्त्यांची तपासणी करणेबाबत महासंचालक, मेडा, पुणे यांना कळविले आहे. त्यांचेकडून अहवाल अप्राप्त आहे. सद्यस्थितीत २२८७ दलीत वस्त्यांमध्ये २४९५९ पथदिवे लावण्यात आले असून १९१७२ पथदिवे कार्यान्वीत आहेत.

दि.३१/३/२०१५ नंतर दलित वस्त्यांमध्ये सौर पथदिवे पुरवठा न करणेबाबत सर्व पुरवठा धारकांना कळविले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १२/५/२०१५ अन्वये सौर पथदिवे लावण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य सहकारी संघाच्या अतिरिक्त सहकार आयुक्तांनी केलेल्या चौकशीत संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत

**(६३) * १८०६१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी संघाच्या कलम ८३ नुसार अतिरिक्त सहकार आयुक्तांनी केलेल्या

चौकशीत संस्थेचे १०६१ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अतिरिक्त सहकार आयुक्तांनी संचालक व इतर सहकारी संस्थांमधील विद्यमान संचालक यांना दोषी ठरविले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी संचालक यांच्यावर फौजदारी कार्यवाही करुन त्यांची पदे रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, चौकशी अहवालात एकूण आर्थिक नुकसान रक्कम रुपये १०६९,३३,३७,२७८/- असल्याचे नमूद केले आहे.

(२) राज्य सहकारी संघाचे तत्कालिन संचालकांवर व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर दि.१२.१.२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ७२(३) नुसार दोषारोप पत्र ठेवले आहे.

(३) संबंधित संचालकांवर दि.८.९.२०१२ रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे एफ.आय.आर. दाखल केले आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.७३७४/२०१२, क्र.७६५२/२०१२, क्र.७९२०/२०१२, क्र.७६५७/२०१२ दाखल झालेल्या असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची कलम ८३ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीची संविभाजीत चौकशी फी ची जबाबदारी निश्चित करणेचे कलम ८५ चे आदेश दि.८.५.२०१५ रोजी निर्गमित करणेत आले आहेत.

(४) १. प्रश्न उद्भवत नाही.

२. रिट याचिका क्र.२८००/२०१५, १४६२/२०१५, १२०१/२०१५ नुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद ने दि.१५.४.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार कलम ८८ च्या चौकशीला स्थगिती दिलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## पेण (जि.रायगड) येथील पेण अर्बन बँकेत बोगस कर्जखात्याद्वारे केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची तपासणी करणेबाबत

**(६४) * १८९५१ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर**

**भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील पेण अर्बन बँकेत बोगस कर्जखात्याद्वारे आर्थिक गैरव्यहाराला चार वर्ष पूर्ण होऊन तपासाची कोणतीच प्रगती झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहाराबाबत तपास तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काये आहेत तसेच सदर प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४), सदर बँकेमधील गैरव्यवहाराबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहाकारी संस्था त्यांच्या दि.२९.३.२०११ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ खाली नियुक्ती केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रु.८६८.०४ कोटी इतक्या रकमेची जबाबदारी ७२ व्यक्तींवर निश्चित करुन त्यांच्यावर कलम ९५ अन्वये जप्तीच्या नोटीसा देऊन मालमत्ता जप्त केल्या आहेत. तथापि, सहकारी अपिलेट न्यायालयाने संचालक मंडळाच्या मालमत्ता जपत न करणेबाबतचे आदेश दि. २०.२.२०१४ रोजी दिले आहेत. तसेच पेण पोलीस स्टेशन तपास अधिकारी यांनी भारतीय दंड विधान संहितेमधील कलमान्वये बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द गुन्ह्याची नोंद करुन अटक केली. पोलीस तपासाअंती ४५ व्यक्तींविरुध्द २ चार्जशीट फौजदारी न्यायालय, पेण येथे दाखल केले आहे.

बँकेच्या रकमेतून खरेदी केलेल्या रायगड जिल्ह्यातील दोन मालमत्ता तसेच १२८ बोगस कर्ज खात्यातुन खरेदी केलेल्या श्री.शैलेश देशपांडे व इतर यांच्या नावे असलेल्या ३९ मालमत्ता गृह विभागाच्या दि.२४.०७.२०१३ च्या अधिसुचनेद्वारे उप विभागीय अधिकारी, पेण यांनी जप्त केल्या असून त्यापैकी १५ मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीची प्रक्रीया सुरु केली आहे, सदर मालमत्तांच्या ७/१२ नोंदी केल्या आहेत.

जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड यांनी १२८ बोगस कर्जदारांच्या तपासणी करिता दि. ०८.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये ५ पोलीस अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाची नेमणुक केली असून तपास प्रगतीपथावर आहे.

-----------------

## सुसर्दा (ता.धारणी, जि.अमरावती) येथे शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना व्हिटॅमिन्स औषधे वाटप न केल्याबाबत

**(६५) * १७००६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुसर्दा (ता.धारणी, जि.अमरावती) येथे शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या व्हिटॅमिन्स व औषधे वाटप न करता कच-यात जाळून टाकल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

काही विद्यार्थ्यांनी व्हिटॅमिन औषधी न पिता औषधीच्या बाटल्या फेकून दिल्या व त्या व्हिटॅमिन औषधाच्या बाटल्या सकाळी कचऱ्यासोबत जाळल्या गेल्याचे प्रकल्प अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत आढळून आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी धारणी यांनी चौकशी केली असून चौकशी अहवालानुसार प्रथमदर्शनी मुख्याध्यापक व अधिक्षक दोषी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली, चौकशीअंती त्यांची एक वेतनवाढ एका वर्षाकरीता रोखण्यात आलेली आहे.

-----------------

**शासनाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(६६) * १६८४४ अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिकदृष्ट्या कमकुवत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या उत्पन्नानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने शिष्यवृत्ती दिली जाते, परंतु अनेक विद्यार्थी हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक फी भरण्यास असमर्थ ठरत असल्यामुळे असे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते, परंतू यावर्षी कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक तसेच प्रोफेशनल अभ्यासक्रमामध्ये पदविका, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मार्च, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक येथील मविप्र शिक्षण संस्थेत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ही बंद झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती बंद करण्यामागील कारणांची शिक्षण विभागाकडून चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व दोषी असलेल्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्यामुळे शासनाने घेतलेल्या निर्णयाचा पुर्नविचार करुन मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही

(२) नाही

ज्या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देय आहे. अशा अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती सुरु असून ती बंद करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसईझेड (विशेष आर्थिक क्षेत्र) प्रकल्प रद्द झाल्याबाबत**

**(६७) * १७२८८ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६९ एसईझेड (विशेष आर्थिक क्षेत्र) प्रकल्प रद्द झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसईझेड रद्द झाल्याने तब्बल २५ लाख ३८ हजार ६२५ बेरोजगार स्थानिक तरुण तरुणींना मिळणाऱ्या नोकरीस मुकावे लागल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पातून होणाऱ्या तब्बल ५३ हजार ३१३ कोटींच्या गुंतवणुकीला ही राज्य शासनाला मुकावे लागले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ६९ रद्द प्रकल्पांसाठी २५ हजार २२३ हेक्टर जमिन अधिसुचीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे जिल्हयात खेड व शिरुर तालुक्यातील हजारो हेक्टर अतिशय अल्प दराने खरेदी केलेली जमिन शेतकऱ्यांना पुन्हा देण्याबाबत व जमिनींवरील एसईझेड साठी राखीव असे शेरे काढण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली व शासनाची प्रतिक्रिया काय आहे,

(६) असल्यास, प्रश्न भाग १,२,३,४,५ बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाची मान्यता प्राप्त केलेल्या १३९ विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी ६९ अधिसूचित /अंतिम मान्यता प्राप्त / तत्वत: मान्यता मिळालेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांनी, केंद्र सरकारचे विशेष आर्थिक क्षेत्राविषयी बदललेले धोरण किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक मंदी यामुळे त्यांची विशेष आर्थिक क्षेत्र ना-अधिसूचित केली आहेत/माघार घेतली आहे. त्यामुळे नियोजित उद्दिष्टे साध्य होऊ शकली नाहीत.

(४) रद्द केलेल्या ६९ प्रकल्पापैकी १९ प्रकल्पांबाबत विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याच्या अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याने २९७१.२५ हेक्टर इतके क्षेत्र केंद्र शासनाकडून अधिसूचित करण्यात आले हाते.
(५) व (६) महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ शासन निर्णयान्वये दिनांक २२/०२/२०१३ रोजी जाहिर केले असून ना-अधिसूचित झालेल्या किंवा प्रस्ताव मागे घेतलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या जमिनीचा वापर एकात्मिक क्षेत्रे विकसित करण्यासाठी संकल्पित आहे. या संदर्भात सविस्तर अटी व शर्ती आणि मार्गदर्शक तत्त्वे शासनाकडून विहीत करण्यात येत आहेत.
(७) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**मानखुर्द मंदबुध्दी बालगृहातील मुलांच्या पालनपोषणासाठी दिलेल्या अनुदानाबाबत**

**(६८) * १९६३१ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ''मानखुर्द मंदबुध्दी बालगृहातील मुलांच्या पालनपोषणासाठी शासन देत असलेल्या रुपये ८५० अनुदानाबाबत'' या विषयावरील निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधीनी मा. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) सामाजिक न्याय विभागाच्या दि. २५.६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मानखुर्द येथील मतिमंद बालगृहासाठी ७६ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच तेथील कर्मचाऱ्यांसाठी वेतनावर १०० टक्के अनुदान, ८ टक्के वेतनेत्तर अनुदान व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्राप्रमाणे मान्य क्षेत्रफळाच्या ७५ टक्के इमारत भाडे मंजूर करण्यात आले आहे. तसेच प्रतिलाभार्थी प्रतिमाह रु.९९०/- परिपोषण अनुदान १२ महिन्याकरीता मंजूर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे (बार्टी) प्रशिक्षणासाठी निधी उपलब्ध नसल्याबाबत**

**(६९) * १६३४६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय विभागातंर्गत येणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने (बार्टी) राबविण्यात येणा-या विविध प्रशिक्षण उपक्रमात ओबीसी, एनटीव्हीजे, एसबीसी प्रवर्गासाठी शासानाने निधीची तरतूद न केल्याने बार्टी तर्फे चालविण्यात येणा-या प्रशिक्षणाच्या सर्व योजना २०१५-१६ पासून बंद करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बार्टीकडे निधी नसल्यामुळे प्रशिक्षणाच्या योजना बंद झाल्यामुळे इतर मागासवर्ग , विमुक्त जाती , भटक्या जमाती , विशेष मागासवर्ग इत्यादी प्रवर्ग प्रशिक्षणापासून वंचित राहणार असल्याने त्यांचे शैक्षणिक उत्कर्ष कुंठीत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, तसेच बार्टीला निधी न देण्याची कारणे काय आहेत व उक्त निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत फक्त अनुसुचित जाती प्रवर्गासाठी प्रशिक्षण योजना राबविण्याकरीता शासनातर्फे निधी उपलब्ध करुन दिला जातो. अन्य प्रवर्गासाठी प्रशिक्षणाकरीता निधी दिला जात नाही. त्यामुळे सन २०१५-१६ या वर्षापासून अन्य प्रवर्गासाठी प्रशिक्षण योजना बंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तिलारी नदीवरील कुडासे-हेवाळेदरम्यान पूल बांधण्याबाबत**

**(७०) * २०३४७ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तिलारी नदीवरील कुडासे-हेवाळे या दरम्यान

पूल बांधण्यात यावा म्हणून मागील ३० वर्षापासून त्या परिसरातील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, अधिक्षक अभियंता, सा.बा.मंडळ, रत्नागिरी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग सावंतवाडी आदींना लेखी निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेट घेवून विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास कुडसे गावातील भरपाल, पणतुर्ली येथील शेकडो मुले नदीपलिकडे वसलेल्या वानोशी वाडीतील सरस्वती विद्यामंदिर या ठिकाणी जीव धोक्यात घालून शिक्षणासाठी दरवर्षी (पावसातही) होडीतूनच प्रवास करित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिलारी नदीवरील कुडसे व हेवाळे या दरम्यान पूल बांधण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने सदरहू पुलाचे काम विनाविलंब पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) कुडासे बानोशीवाडी व देऊळवाडी जोडण्यासाठी तिलारी नदीवरील कॉजवेवरुन शाळेची मुले ये-जा करतात. तथापि, पावसाळ्यात पुराच्या वेळी कॉजवेवरील वाहतूक खंडीत होते.

(३) व (४) कुडासे पुलाचे काम नाबार्ड-१९ अंतर्गत प्रगतीत आहे.

हेवाळे पूल बांधण्याचा प्रस्ताव सिंधुदूर्ग जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे. त्यास अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील पोळसा पुलाचे पिलर वाकल्याबाबत

**(७१) * १६६५८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील पोळसा व्यंकटपूर सिमा जोडणारा वर्धा नदीवर करोडो रुपये खर्च करुन पोळसा पुलाचे बांधकाम दोन वर्षापूर्वी करण्यात आले असतांना सुध्दा त्या पुलाचा नववा पिलर (आधार स्तंभ) वाकल्यामुळे केव्हाही पुल कोसळून अपघात होण्याची परिस्थिती निर्माण झाली असल्याची धक्कादायक माहिती दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदोष बांधकामामुळे सदर पुलाचा पिलर कोसळण्याच्या मार्गावर असल्यामुळे या पूलावरुन होणारी वाहतूक थांबविण्यात आल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामाची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यासाठीचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री,मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री ,अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच चौकशी करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जुलै/ऑगस्ट, २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरामुळे सदर पुलाचा एका पियरचा पायवा किंचितसा दबल्याचे ऑगस्ट, २०१३ मध्ये आढळून आले.
(२) पुलाला धोका नसल्यामुळे पुलावरुन सर्व प्रकारची वाहतुक सद्य:स्थितीत सुरळीत सुरु आहे.
(३) होय.
(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नागपूर यांच्यामार्फत चौकशी प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-वाडा-मनोर व भिवंडी-कामण वसई या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(७२) * २०७४२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-वाडा-मनोर व भिवंडी-कामण वसई या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम गेल्या ३ वर्षापासून सुप्रिम इन्फ्रा.प्रा.लि. कंपनीमार्फत करण्यात येत असून अद्याप दोन्ही रस्त्यांची कामे अपुर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अपूर्ण कामांमुळे दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असल्याप्रकरणी स्थानिक व शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे तक्रार करुनही संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत असतानाही तेथे टोल वसूली होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच भिवंडी-वाडा-मनोर या रस्त्यांकरिता ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. त्या शेतकऱ्यांच्या मोबदल्याचे धनादेश वटविण्यात आले असून ते संबंधित शेतकऱ्यापर्यंत पोहोचले नसून सुप्रिम कंपनीच्या काही कर्मचाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना मिळणाऱ्या रकमेत गैरव्यवहार केल्याची बाब निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील सर्व प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना तात्काळ देण्याबाबत व सदरहू दोन्ही रस्त्यांच्या चौपदरीकरणाची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

भिवंडी-वाडा-मनोर या रस्त्याच्या ६४.३२ कि.मी. लांबीपैकी वन विभागाच्या हद्दीत १०.१२ कि.मी. वगळता, इतर लांबीत चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले आहे. वन विभागाच्या हद्दीत ७.०० मी. ते १४ मी. इतक्या रुंदीत काम झालेले आहे.

भिवंडी-कामण-वसई रस्त्याच्या (२६.४२५ कि.मी.) लांबीतील चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले असून १ मोठा पूल (खारबांव) व १ स्लॅबड्रेनचे (दापोडी गाव) काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अंशतः खरे आहे. जमिन संपादनापोटी शेतकऱ्यांना मोबदला देण्याची जबाबदारी उद्योजकाची आहे. उद्योजकाने या बाबत पोलीसात तक्रार दाखल केली असून पोलीसांमार्फत चौकशी सुरु आहे.

(५) अ) संबंधित बाधित शेतकऱ्यांचा मोबदला तात्काळ अदा करणेसाठी उद्योजक सुप्रिम कंपनीस निर्देश देण्यात आले आहेत.

ब) वनविभागाच्या हद्दीमध्ये अपूर्ण असलेले चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या वन विभागाची अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड येथील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन देण्याबाबत**

**(७३) * १७१२३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे शासनाने निराधारांना आधार मिळावा यासाठी सुरु केलेल्या संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून मिळणारे मानधन गेल्या तीन महिन्यापासून मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) नांदेड जिल्हयातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप आय.सी.आय.सी.आय. बँकेमार्फत बायोमेट्रीक पध्दतीने करण्यात येते. सदर बँकेच्या काही तांत्रिक अडचणीमुळे लाभार्थ्यांना मार्च, एप्रिल व मे, २०१५ या कालावधीचे अनुदान वेळेवर वाटप करता आले नाही. या संदर्भात जिल्हाधिकारी, नांदेड यांनी आय.सी.आय.सी.आय. बँकेसोबत बैठक घेऊन अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले.

आता, दि.१५ जून, २०१५ पासून नांदेड जिल्हयात सर्व तालुक्यांमध्ये अनुदानाचे वाटप सुरु झालेले आहे.

-----------------

**अण्णाभाऊ साठे महामंडळात झालेला गैरव्यवहार**

**(७४) * १८०६३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय काळे**

**(शिवाजीनगर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चु कडू(अचलपूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळात बनावट लाभार्थी दाखवून कर्ज काढणे, बँकेतून लाखो रुपयांची रोख रक्कम काढून ती लाभार्थ्यांना न देऊन, प्रचलित दरांपेक्षा जास्त रक्कम मोजून प्लॉट खरेदी करणे, हितसंबंधी संस्थाना कर्जवाटप करून महामंडळात सुमारे २५० कोटीहून अधिक रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आले असून त्याची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येईल असे सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक १५ मे, २०१५ रोजी व त्या दरम्यान सांगितले हे खरे आहे काय,

(२) तसेच, महामंडळाच्या बीड, जालना, परभणी, हिंगोली, भंडारा आणि बुलढाणा या सहा जिल्हयातील कर्मचाऱ्यांनी तब्बल ८० कोटी रुपयांची रक्कम महामंडळाच्या खात्यामधून परस्पर काढून गैरव्यवहार केल्याचे दिनांक १४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळातून कोणाला व्यवसाय वा अन्य कारणांसाठी कर्ज द्यायचे असेल तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रस्तावांची छाननी करून शिफारस करते तथापी ही प्रकिया न अवलंबिता मुंबई मुख्यालयातून प्रस्ताव मंजूर करून बोगस गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले तसेच महामंडळाची कोणतीही जाहीरात न देता , मुलाखती व लेखी परीक्षा न घेता महामंडळात ७३ जणांची एकाच दिवशी भरती करण्यात आली असून त्यांना तात्काळ नियुक्तीचे पत्र देवून प्रत्येकाला २० लाख रुपयांचे गृहकर्ज देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) प्रथमदर्शनी गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली असून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रा. कि. बावणे यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच रोख रक्कम काढणाऱ्या जिल्हा व्यवस्थापक व संबंधित कर्मचाऱ्यांस निलंबित करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सीआयडी मार्फत व आयुक्त, समाजकल्याण, आयुक्तालय पुणे यांच्या स्तरावर चौकशी चालू आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दोषी व्यक्तींवर पुढील कारवाई करण्यात येईल.

-----------------

**फुलआमला (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील**
**घरकुल लाभार्थ्यांना भूखंड देण्याबाबत**

**(७५) * १७०११ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलआमला (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील ४० अनुसूचित जमातीच्या नागरिकांना रमाई/इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थींची गावठाण अंतर्गत भूखंड मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर, अमरावती यांना दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घरकुल लाभार्थ्यांना भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) रमाई घरकुल योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना भूखंड उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाला कोट्यवधी रुपयांचा झालेला तोटा**

**(७६) * १७२८९ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एमएसआरडीसीचा तोटा ६८९० कोटीच्या घरात गेला असून शासन दिरंगाईमुळे सदरहू महामंडळाला ५२६२ कोटीचे व्याज निष्कारण दयावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएसआरडीसीला शासनाने जे पैसे दयायला हवे होते ते वेळेवर दिले नसल्यामुळे त्यांना बाजारातून एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज घ्यावे लागले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महामंडळाकडून जनतेने दिलेल्या कराचे तब्बल ५२६२ कोटी रुपये खर्च झाले असल्यामुळे मुंबईतील पेडर रोड येथील उड्डाणपुलासह राज्यातील अनेक पुलांची व प्रमुख रस्त्यांची कामे प्रलंबीत असून शासनाने याबाबत कोणती आवश्यक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास देय असलेल्या अनुदानाची रक्कम महामंडळास अदा करण्याबाबतची बाब शासनाच्या विचारधीन आहे. तथापि यामुळे महामंडळाकडील रस्ते व पुलांचे प्रकल्प रखडले सून ते प्रकल्प शासनाच्या विचाराधीन आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जनतेला टोलमुक्त करण्याबाबत**

**(७७) * १६३४७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.कालीदास**

**कोळंबकर (वडाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेल्या टोल नाक्यावरुन दिनांक १ जून, २०१५ पासून अवजड वाहने वगळता हलक्या वाहनांना पथकरातून सुट देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अशा महानगरांमध्ये येणाऱ्या वाहनाच्या अद्यापि टोलमधून वगळण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने राज्यातील टोल नाके सरसकट बंद न करण्याची कारणे काय आहेत,

(४) सदरहू टोलनाके बंद करण्यासाठी तत्कालीन शासनाने घेतलेल्या निर्णयासंदर्भात अभ्यास करुन त्याप्रकरणी जबाबदार असणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर समिती अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहेत व त्या स्वीकारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्याप अहवाल सादर केला नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अखत्यारितील १९ प्रकल्पांवरील २७ व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या १२ प्रकल्पांवरील २६ अशा एकूण ५३ पथकर

स्थानकांवर कार/जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना दिनांक १ जून, २०१५ पासून पथकरातून सूट देण्यात आली आहे व दिनांक २० जून, २०१५ पासून स्कूल बसेसना पथकरातून सूट देण्यात आलेली आहे,
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

म.रा.र.वि. महामंडळाकडील मुंबई महानगर प्रवेशाच्या रस्त्यावरील पथकर नाके, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील व कोल्हापूर शहरासाठीच्या पथकर नाक्यावर कार जीप व एस टी बसेसना पथकरातून सूट दिलेली नाही.

वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता तपासणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या पथकर नाक्यांवर कार/जीप तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना सूट देण्यात आली नाही.
(४) नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे सुरु असलेल्या मुंबई प्रवेशव्दार व मंबई-पुणे द्रुतगती मार्ग या दोन ठिकाणच्या पथकर नाक्यांबाबत वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता ( Viablility ) तपासण्यासाठी दिनांक २.०६.२०१५ रोजी शासन निर्णयान्वये अतिरिक्त मुख्य सचिव (सा.बां) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच कोल्हापूर शहराच्या रस्तावरील पथकर नाके नगर विकास विभागाच्या अधिसुचनेनसार म.रा.र.वि. महामंडळामार्फत कार्यरत असून पथकरबाबत निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (सा.बां) व मा.मंत्री (सा.ऊ) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.
(५) समितीची कार्यवाही सुर असून त्यांच्या अहवाल प्राप्त झाल्यावर त्याबद्दल कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत आहे.

-----------------

**देवबाग (ता.मालवण) येथे देवबाग-तारकर्ली रिंगरोड बांधण्याबाबत**

**(७८) * २४५३३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्वेला कर्लीची खाडी आणि पश्चिमेला अरबी समुद्र यांच्या वेटोळ्यात असलेल्या देवबाग (ता.मालवण) येथील मोबारवाडी ते मालवण असा सलग १० किमी लांबीचा समुद्र किनारा असून देवबाग-तारकर्ली असा नवीन रिंगरोड बांधण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधीनी मागील ३ वर्षाहून अधिक कालावधीपासून मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम

उपविभाग, मालवण, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग आदींकडे लेखी निवेदनाद्वारे सातत्याने मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) देवबाग तसेच तारकर्ली या समुद्र किना-यावर दिवसेंदिवस पर्यटकांची मोठया प्रमाणावर होत असलेली वाढ तसेच समुद्राच्या अतिक्रमणामुळे देवबाग गावांची दरवर्षी होणारी हानी व सध्या तारकर्ली ते देवबाग हा असलेला अरुंद वळणाचा रस्ता व या रस्त्यावरुन दररोज हजारांवर गाड्यांची होणारी ये-जा विचारांत घेवून देवबाग-तारकर्ली असा नवीन रिंगरोड विनाविलंब करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकाराचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२), (३) व (४) वरील मागणी संदर्भातील निवेदन प्राप्त झालेले नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.